गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com

* वर्ष ६५ वे * अंक २८९ * नांदेड * शुक्रवार, दि. ३० ऑक्टोबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

नांदेडसह राज्यातील २२ जि.प.आणि उर्वरित पं.स.च्या निवडणुकीचा मार्ग मोकळा

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रलंबित निवडणुकांना सर्वोच्च न्यायालयाचा हिरवा कंदील

मुंबई (प्रतिनिधी)– महाराष्ट्रातील ग्रामीण राजकारणात लवकरच प्रचाराचा धुरळा उडणार आहे. ओबीसी आरक्षणाच्या कायदेशीर पेचामुळे मागील अनेक महिन्यांपासून रखडलेल्या राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत महत्त्वपूर्ण निर्देश दिले आहेत. लोकशाही प्रक्रिया अनिश्चित काळासाठी रोखून धरता येणार नाही, असे स्पष्ट करत कोर्टाने निवडणुका घेण्याचा मार्ग मोकळा केला आहे.

नांदेडसह राज्यातील २२ जिल्हा परिषद आणि सुमारे २२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकांचा प्रश्न या निर्णयामुळे मार्गी लागण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील तीन सदस्यीय खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी पार पडली. यापूर्वी न्यायालयाने बांठिया आयोगाच्या अहवालापूर्वी अस्तित्वात असलेल्या ओबीसी आरक्षण व्यवस्थेनुसार निवडणुका घेण्यास परवानगी दिली होती. मात्र, काही ठिकाणी आरक्षणाची एकूण मर्यादा ५० टक्क्यांपेक्षा जास्त होत असल्याचा मुद्दा उपस्थित झाल्याने पेच निर्माण झाला होता.

सर्वोच्च न्यायालयाने आपल्या आदेशात स्पष्ट केले आहे की, ओबीसी आरक्षण लागू करताना अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी) आणि इतर आरक्षणांची एकत्रित मर्यादा ५० टक्क्यांच्या आत ठेवणे बंधनकारक असेल. या घटनात्मक मर्यादेचे काटेकोर पालन करूनच निवडणुका पार पाडाव्या लागणार आहेत. न्यायालयाच्या या भूमिकेमुळे ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लोकप्रतिनिधी निवडले जाण्याचा पेच सुटला आहे.

जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या या ग्रामीण विकासाच्या कणा मानल्या जातात. रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण तसेच ग्रामीण भागातील विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमध्ये या संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. निवडणुका लांबल्यामुळे ग्रामीण विकासाची अनेक कामे रखडली होती. आता या निर्णयामुळे स्थानिक पातळीवर राजकीय हालचालींना वेग येणार आहे. आता राज्य निवडणूक आयोग यावर काय भूमिका घेतो, निवडणुकीचा सविस्तर कार्यक्रम कधी जाहीर होतो आणि प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेचे नियोजन कसे होते, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागून आहे.

दोन सख्खे भाऊ बनले आमदार! पहाटे ५ वाजून १० मिनिटांनी विजयाचे प्रमाणपत्र प्रदान

- ३९ उमेदवारांच्या वगळणीनंतर अंतिम निकाल जाहीर
- सलग ४५ तासांहून अधिक काळ मतमोजणी
- डॉ. प्रतापसिंह पाटील यांना ८५ हजार ८७६, तर सतीश चव्हाण यांना ६७ हजार ७५२ मते

छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)– औरंगाबाद पदवीधर मतदारसंघ निवडणुकीच्या निकालानंतर मराठवाड्यात दोन सख्खे भाऊ आमदार बनले आहेत. औरंगाबाद पदवीधर मतदारसंघातून विजयी झालेले प्रतापसिंह पाटील हे परभणीचे शिवसेना ठाकरे गटाचे आमदार राहुल पाटील यांचे सख्खे मोठे भाऊ आहेत.

विधान परिषदेच्या ०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार डॉ. प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील हे १८ हजार १२४ मतांनी विजयी झाले आहेत. त्यांना ८५ हजार ८७६ मते मिळाली, तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार सतीश भानुदासराव चव्हाण यांना ६७ हजार ७५२ मते मिळाली. पसंतीक्रमानुसार ३९ उमेदवारांची वगळणी व मतहस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अंतिम मतमोजणीत डॉ. पाटील यांनी सर्वाधिक मते मिळवली. भारत निवडणूक आयोगाकडून निकालासंदर्भातील पुढील प्रक्रियेस मान्यता प्राप्त झाल्यानंतर गुरुवार, दि. २९ ऑक्टोबर रोजी पहाटे ५ वाजून १० मिनिटांनी निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी डॉ. पाटील यांना विजयी घोषित केले.

छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर व धाराशिव या आठ जिल्ह्यांतील ८४२ मतदान केंद्रांवर झालेल्या या निवडणुकीत ४१ उमेदवार रिंगणात होते. मतमोजणीसाठी ७० टेबलांची व्यवस्था करण्यात आली होती.

मतमोजणीच्या प्रारंभी मतपत्रिकांची पडताळणी व वर्गीकरण करण्यात आले. त्यानंतर पहिल्या पसंतीच्या मतांची मोजणी तीन फेऱ्यांत पूर्ण करण्यात आली. पहिल्या फेरीत ७० हजार ५१९, तर दुसऱ्या फेरीअखेर एकत्रित १ लाख ४० हजार ५४३ मतपत्रिकांची मोजणी करण्यात आली. मतमोजणीच्या आकडेवारीनुसार एकूण १ लाख ७७ हजार ११५ मते वैध, तर १६ हजार ५४० मते अवैध ठरली. वैध मतांच्या आधारे विजयासाठी ८८ हजार ५५८ मतांचा कोटा निश्चित करण्यात आला.

पहिल्या पसंतीच्या मतमोजणीअखेर डॉ. प्रतापसिंह पाटील यांना ७३ हजार ९३१, सतीश चव्हाण यांना ६० हजार ७६८, अपक्ष उमेदवार रविराज उर्फ अण्णासाहेब सावळे-पाटील यांना १९ हजार ८३५, तर दिलीप घुगे यांना ८ हजार ४३९ मते मिळाली.

बाभळी बंधाऱ्याचे दरवाजे बंद; पाणी मात्र गायब!

अल्प पावसामुळे बंधारा कोरडा; उन्हाळ्यात तीव्र पाणीटंचाईचे संकट



धर्माबाद (प्रतिनिधी)– बाभळी बंधाऱ्याचे दरवाजे बंद करण्याची प्रक्रिया गुरुवारी पूर्ण झाली, मात्र बंधाऱ्यात पाणीसाठाच नसल्याने परिसरातील गावांच्या पाण्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. यंदा अल्प पावसामुळे बंधारा कोरडाठाक पडला असून, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार त्रिसदस्यीय समितीच्या उपस्थितीत सर्व १४ दरवाजे बंद करण्यात आले. पावसाअभावी निर्माण झालेली परिस्थिती पाहता आगामी उन्हाळ्यात पाणीटंचाईची समस्या तीव्र होण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्र आणि तेलंगणा राज्यांदरम्यान बाभळी बंधाऱ्याच्या निर्मितीवरून वाद निर्माण झाला होता. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेल्यानंतर २८ फेब्रुवारी २०१३ रोजी न्यायालयाने यासंदर्भात निकाल दिला. त्यानुसार दरवर्षी १ जुलै रोजी बंधाऱ्याचे दरवाजे उघडणे आणि २९ ऑक्टोबर रोजी बंद करणे बंधनकारक आहे. उपलब्ध जलसाठ्यापैकी ०.६ टीएमसी पाणी १ मार्च रोजी तेलंगणात सोडण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

बंधाऱ्यात पाणीसाठा उपलब्ध नसल्याने दरवाजे बंद करण्याच्या नियमित प्रक्रियेपलीकडे पाण्याच्या उपलब्धतेचा प्रश्न महत्त्वाचा ठरला आहे. परिसरातील गावांना भविष्यात पुरेसे पाणी उपलब्ध होण्यासाठी प्रशासनाला पर्यायी स्रोत आणि पाणीपुरवठ्याच्या नियोजनाकडे लक्ष द्यावे लागणार आहे.

यावेळी कार्यकारी अभियंता एन. चरण, सहायक कार्यकारी अभियंता रवी कोत्ता, सी. आर. बनसोड, अभियंता सी. डी. पोतदार, आर. बी. खिंदारे, पी. एस. घुगे, आर. के. अय्यर आणि एस. बी. नेमाने उपस्थित होते.

सकाळी १०.३० वाजता पहिला दरवाजा बंद

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार गुरुवारी सकाळी साडेसहा वाजता पहिला दरवाजा बंद करण्यात आला. त्यानंतर सुरू झालेली प्रक्रिया दुपारी दोन वाजेपर्यंत पूर्ण झाली. त्रिसदस्यीय समितीच्या उपस्थितीत बंधाऱ्याचे सर्व १४ दरवाजे बंद करण्यात आले.

पाणीटंचाईच्या सावटाखाली गावे

यंदा अल्प पावसामुळे बाभळी बंधाऱ्यात अपेक्षित जलसाठा निर्माण झाला नाही. त्यामुळे आगामी उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची उपलब्धता हा परिसरातील गावांसाठी चिंतेचा विषय ठरू शकतो. संभाव्य टंचाई टाळण्यासाठी प्रशासनाने पर्यायी पाणीपुरवठ्याचे नियोजन करण्याची गरज आहे.

दुचाकीचा कट मारल्याच्या क्षुल्लक कारणावरून १७ वर्षीय मुलाचा धारदार शस्त्राने खून; ३ संशयित ताब्यात

नांदेड (प्रतिनिधी)– दुचाकीचा कट मारल्याच्या क्षुल्लक कारणावरून झालेल्या वादाचे पर्यवसान एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलाच्या निर्घृण खुनात झाले आहे. शहरातील वजिराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गंगाचाळ परिसरात बुधवारी रात्री ही धक्कादायक घटना घडली. सिद्धार्थ उर्फ धीरज वैजनाथ थोरात (वय १७, रा. नल्लागुट्टा चाळ) असे खून झालेल्या अल्पवयीन मुलाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नल्लागुट्टा चाळ परिसरात राहणाऱ्या सिद्धार्थचा भीमघाट परिसरातील काही तरुणांशी दुचाकीचा कट मारल्याच्या कारणावरून वाद झाला होता. या वादातून पाच जणांनी त्याच्यावर धारदार शस्त्रांनी वार केल्याची माहिती समोर आली आहे. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या धीरजला तात्काळ उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच वजिराबाद पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली संशयितांचा शोध सुरू करण्यात आला.

या कारवाईत पोलिसांनी तीन संशयितांना ताब्यात घेतले असून, अन्य दोघे फरार आहेत. फरार आरोपींना पकडण्यासाठी पोलिसांची विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

फटाक्यांवर पूर्ण बंदी घालण्यास सर्वोच्च न्यायालयाचा नकार

मुंबई (प्रतिनिधी)– दिवाळीच्या सणाच्या पार्श्वभूमीवर दिल्ली-एनसीआर मध्ये फटाक्यांवर पूर्णपणे बंदी घालण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत महत्त्वपूर्ण आणि मोठी टिप्पणी केली आहे. सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, न्यायालय फटाक्यांवर पूर्ण बंदी घालण्याच्या बाजूने नाही, तर याप्रकरणी एक संतुलित आदेश पारित केला जाईल.

सणांच्या काळात लोकांच्या उत्साहावर किंवा आनंदावर गदा आणण्याची न्यायालयाची मुळीच इच्छा नाही, असे स्पष्ट करत न्यायालयाने फटाक्यांचे नियम मोडणाऱ्यांवर आणि अवैध विक्री करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

दरवर्षी या विषयावर आदेश जारी करावे लागण्यावर भाष्य करताना न्यायालयाने म्हटले की, हा विषय आता न्यायालयासाठी केवळ एक शैक्षणिक मुद्दा बनला आहे. न्यायालयाच्या आदेशांचे पालन कमी आणि उल्लंघनच जास्त होते, असे न्यायाधीशांनी मान्य केले. केवळ बंदी घालून या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा निघू शकत नाही, त्यामुळे केवळ कागदी आदेशांपेक्षा कठोर अंमलबजावणी आवश्यक असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले.

हिंगोलीतील जनशताब्दी सुपरफास्ट रेल्वेचा दर्जा नॉन-सुपरफास्टमध्ये!

नांदेड (प्रतिनिधी)– दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागामार्फत धावणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-हिंगोली डेक्कन जनशताब्दी एक्सप्रेस आणि हिंगोली डेक्कन-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस जनशताब्दी एक्सप्रेस या २ गाड्यांचा सुपरफास्ट दर्जा नॉन सुपरफास्ट बदलण्यात आला आहे.

हा बदल दि. १ जानेवारी २०२७ पासून लागू होणार असून त्यानुसार या गाड्यांचे क्रमांकही बदलण्यात आले आहेत. या दोन्ही गाड्यांचे थांबे पुर्वीप्रमाणेच असणार आहेत. दि. १ जानेवारी २०२७ रोजीपासून गाडी क्रमांक ११०६९ आणि ११०७० या नवीन क्रमांकाने नॉन सुपरफास्ट म्हणून धावतील.

प्रवाशांनी तिकीट आरक्षण, प्रवासाचे नियोजन तसेच रेल्वेच्या डिजीटल माध्यमांवर गाडीची माहिती पाहताना नवीन गाडी क्रमांकाची नोंद घ्यावी, असे आवाहन दक्षिण मध्य रेल्वे नांदेड विभागाकडून करण्यात आले आहे.

नांदेडमध्ये उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत योगिक महासंमेलन

१ नोव्हेंबरला १०० आदर्श योग साधकांना 'आरोग्य रत्न' पुरस्कार

नांदेड (प्रतिनिधी)– श्री विराट विश्वकर्मा बहुउद्देशीय संस्था अंतर्गत नांदेड योग सेवा समितीच्या वतीने येत्या दि. १ नोव्हेंबर, रविवार रोजी सकाळी ५ ते ८ या वेळेत अनिल लॉन्स, निळा रोड, नांदेड येथे भव्य योगिक महासंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे महासंमेलन योगाचार्य, नांदेड योग रत्न भूषण सिताराम गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली होणार असून, या संमेलनाचे उद्घाटन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नांदेड उत्तरचे आमदार बालाजीराव कल्याणकर असणार असून, प्रमुख उपस्थिती म्हणून १०८ श्री वेदांतचार्य दिगंबर स्वामी महाराज, वसमत यांची उपस्थिती लाभणार आहे.

या महासंमेलनाला नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, स्वा.रा.ती.म. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण शिवानंद मीनगिरे, माजी शिक्षण संचालक डॉ. गोविंद नांदेडे, आदर्श योग गुरु अरविंद जाधव, प्रजावाणीचे संपादक शंतनू डोईफोडे, दैनिक गोदातीर समाचारचे संपादक केशव घोणसे पाटील, पत्रकार संघटनेचे अध्यक्ष संतोष पांडागळे, उद्योजक अनिल शेटकार, नारायण चांदोजी पावडे, श्रेणिक नागडा, भारत रामीनवार यांच्यासह अनेक वरिष्ठ अधिकारी, उद्योजक व पत्रकार उपस्थित राहणार आहेत.

१०० योग साधकांचा 'आरोग्य रत्न' पुरस्काराने सन्मान

नांदेड योग सेवा समिती अंतर्गत शहरात चालणाऱ्या १४ ते १५ शाखांमधील १०० आदर्श शिक्षक व आदर्श योग साधकांना या महासंमेलनात 'आरोग्य रत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. या योगिक महासंमेलनाचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन नांदेड योग सेवा समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

मुदखेडच्या नंदीनगरमध्ये मध्यस्थी करण्यास गेलेल्या २० वर्षीय तरुणाचा दगड-विटांनी ठेचून खून; १२ आरोपींना बेड्या

नांदेड (प्रतिनिधी)– मुदखेड शहरातील नंदीनगर येथे जुन्या भांडणातून झालेल्या हाणामारीत मध्यस्थी करण्यासाठी गेलेल्या २० वर्षीय तरुणाचा निर्घृण खून झाल्याची धक्कादायक घटना दि. २८ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी घडली. या प्रकरणी पोलिसांनी १२ आरोपींना अटक केली आहे.

दि. २८ ऑक्टोबर रोजी दुपारच्या सुमारास नंदीनगर, मुदखेड येथे भीमराव नकलवाड आणि शेषेराव उर्फ केशव नकलवाड या दोन गटांमध्ये जुन्या भांडणावरून वाद उफाळून आला. हा वाद सोडवण्यासाठी गल्लीतील इतर लोकांसह अर्जुन उर्फ अजय शिवाजी नकलवाड (वय २०, रा. नंदीनगर) हा तरुण मध्यस्थी करण्यास गेला होता.

त्यावेळी दंगा करणाऱ्या आरोपींनी अर्जुनच्या गळ्यावर आणि छातीवर दगड व विटांनी जबर मारहाण केली. या मारहाणीत तो गंभीर जखमी होऊन जमिनीवर कोसळला. त्याला तात्काळ ग्रामीण रुग्णालय, मुदखेड येथे दाखल करण्यात आले असता, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याला मृत घोषित केले.

मयताची आई लक्ष्मीबाई शिवाजी नकलवाड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मुदखेड पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्र. २२७/२०२६ कलम १०३(१), १८९(२), १९०, १९१(२) बीएनएस अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांनी आरोपींना तात्काळ अटक करण्याचे आदेश प्रभारी अधिकारी गणेश कराड यांना दिले होते. अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील (भोकर) आणि उपविभागीय पोलीस अधिकारी माणिक बेद्रे (नांदेड ग्रामीण) यांनी घटनास्थळी भेट देऊन पथके स्थापन केली.

प्रभारी अधिकारी मुदखेड यांच्या नेतृत्वात पोलिसांनी कोणताही विलंब न करता रात्रीच कसून शोधमोहीम राबवून अवघ्या काही तासांत १२ आरोपींना ताब्यात घेतले.

अटकेतील १२ आरोपी: भीमराव चिन्नना नकलवाड (वय ६५), सुभाष भीमराव नकलवाड (वय २८), रमेश भीमराव नकलवाड (वय २७), राहुल भीमराव नकलवाड (वय २२), बाबुशा भीमराव नकलवाड (वय ३५), शेषेराव उर्फ केशव गोविंद नकलवाड (वय ६०), संभाजी शेषेराव नकलवाड (वय २७), मारोती शेषेराव नकलवाड (वय २५), अर्जुन उर्फ राजेश शेषेराव नकलवाड (वय २०), आकाश शेषेराव नकलवाड, रवी उर्फ मुन्ना नकलवाड (वय २१) आणि सुनील भीमराव नकलवाड (वय २५) सर्व रा. नंदीनगर, मुदखेड या सर्व आरोपींना कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून न्यायालय, मुदखेड येथे हजर करण्यात आले असता तीन दिवसाची पोलीस कोठडी देण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे.

ही कामगिरी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने अपर पोलीस अधीक्षक श्रीमती अर्चना पाटील, उपअधीक्षक माणिक बेद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक गणेश कराड, सपोनि कल्पना राठोड, पोउपनि सुरेश जाधव, राजेश नंद, आकाश सरोदे व अंमलदार ठाकूर, पाटील, म्हैसनवाड, चक्रधर, झुंझारे, वानोळे, कारामुंगे, पुणेबोईनवाड यांनी पार पाडली.

ओला-उबरच्या मनमानीला चाप बसणार; स्वतंत्र टॅक्सी चालकांसाठी स्वतंत्र तंत्रज्ञान प्लॅटफॉर्म आणण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

मुंबई (प्रतिनिधी)– राज्यातील ॲप-आधारित प्रवासी वाहतूक क्षेत्रात स्वतंत्र टॅक्सी चालकांना न्याय मिळवून देण्यासाठी राज्य सरकारने आता कठोर पावले उचलली आहेत. ओला, उबर आणि इतर मोठ्या फ्लीट ऑपरेटर कंपन्यांच्या मनमानी कारभाराला आळा घालण्यासाठी आणि प्रवाशांच्या वाटपात पारदर्शकता आणण्यासाठी सर्वांना समान संधी देणारे स्वतंत्र तंत्रज्ञानाचे प्लॅटफॉर्म विकसित करण्याचे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी महाराष्ट्र मोटार व्हेईकल ॲग्रीगेटर रुल्स, २०२६ अंतर्गत समुच्चय वाहन धोरणाच्या अंमलबजावणीबाबत मुख्यमंत्र्यांकडे एक सविस्तर सादरीकरण केले. त्यानंतर हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. सध्या राज्यात ओला, उबर व इतर कंपन्यांच्या माध्यमातून प्रवासी वाहतूक मोठ्या प्रमाणावर विस्तारत आहे. मात्र, या कंपन्यांच्या अल्गोरिदमची कार्यपद्धती स्पष्ट नसल्यामुळे स्वतंत्र टॅक्सी चालकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

शिक्षणव्यवस्थेतील अस्वस्थ करणारे वास्तव

भारतीय तंत्रज्ञान संस्थांसारख्या (आयआयटी) देशातील नामांकित उच्च शिक्षण संस्थांमध्ये विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या घटना घडत राहणे ही केवळ एखाद्या विद्यार्थ्याच्या वैयक्तिक संघर्षाची बाब मानून चालणार नाही. प्रत्येक घटनेनंतर संस्थात्मक जबाबदारी, शैक्षणिक ताण, कौटुंबिक अपेक्षा आणि सामाजिक दबाव यावर चर्चा होते. काही काळ आरोप-प्रत्यारोप होतात आणि त्यानंतर पुन्हा परिस्थिती पूर्वपदावर येते. ही प्रतिक्रियात्मक भूमिका बदलून आत्महत्या रोखण्यासाठी शिक्षणसंस्थांच्या वातावरणातच मूलभूत बदल करण्याची वेळ आली आहे. राजस्थानातील कोटा येथे आत्महत्या करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या खूप जास्त आहे. विद्यार्थ्याची आत्महत्या ही एका दिवसात घडणारी घटना नसते. मानसिक एकाकीपणा, अपयशाची भीती, स्वतःच्या क्षमतेबद्दल निर्माण होणारी नकारात्मक भावना, सततची स्पर्धा आणि भविष्यासंबंधी असुरक्षितता यांचा दीर्घकालीन परिणाम त्यामागे असू शकतो. त्यामुळे केवळ २४ तास उपलब्ध असलेली हेल्पलाइन किंवा समुपदेशन केंद्र सुरू करणे हा या प्रश्नाचा संपूर्ण उपाय होऊ शकत नाही. विद्यार्थ्याला संकटाच्या टोकावर पोहोचण्यापूर्वी ओळखणे आणि त्याला आधार देणे, हा प्रतिबंधात्मक दृष्टिकोन आवश्यक आहे. यामध्ये सर्वांत महत्त्वाची भूमिका शिक्षकांची आहे. विद्यार्थी आपला मोठा वेळ वर्ग, प्रयोगशाळा आणि शैक्षणिक परिसरात घालवतात. त्यामुळे त्यांच्या वर्तनातील सातत्यपूर्ण बदल सर्वप्रथम शिक्षकांच्या लक्षात येऊ शकतात. पूर्वी उत्साही असलेला विद्यार्थी अचानक अलिप्त होणे, वर्गातील सहभाग कमी होणे, सतत अनुपस्थित राहणे, मित्रांपासून दूर जाणे किंवा शैक्षणिक कामगिरीत अचानक घसरण होणे ही संकेतस्थळे दुर्लक्षित करता कामा नयेत. शिक्षकांची भूमिका केवळ गुण देणाऱ्या किंवा शिस्त लावणाऱ्या व्यक्तीपुरती मर्यादित न राहता मार्गदर्शक आणि संवेदनशील निरीक्षकाची असायला हवी. विशेषतः गुण कमी मिळाल्यामुळे किंवा शैक्षणिक चूक झाल्यामुळे विद्यार्थ्याला सार्वजनिकरीत्या लाजविणे, कठोर शब्दांत सुनावणे किंवा त्याची इतरांशी तुलना करणे टाळले पाहिजे. एका परीक्षेतील अपयश म्हणजे आयुष्याचे अपयश नाही, हा विश्वास विद्यार्थ्यांच्या मनात रुजविणे आवश्यक आहे. शिक्षणव्यवस्थेने विद्यार्थ्याला चुका करण्याची आणि पुन्हा उभे राहण्याची संधी दिली पाहिजे. आयआयटीसारख्या निवासी संस्थांमध्ये वसतिगृहाचे वातावरणही तितकेच महत्त्वाचे आहे. गर्दीच्या कॅम्पसमध्ये राहूनही एखादा विद्यार्थी मानसिकदृष्ट्या पूर्णपणे एकटा असू शकतो. मित्रांपासून दूर जाणे, खेळ अथवा सांस्कृतिक उपक्रमांमधून माघार घेणे, सतत खोलीत बंद राहणे किंवा सामूहिक जीवनापासून तुटत जाणे ही धोक्याची चिन्हे असू शकतात. त्यामुळे मानसिक आरोग्य सेवा केवळ प्रशासनाच्या कार्यालयातील समुपदेशन कक्षापुरती मर्यादित न राहता संपूर्ण कॅम्पस संस्कृतीचा भाग बनली पाहिजे. यासाठी प्रवेशाच्या वेळी विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याशी संबंधित मूलभूत माहिती आणि गरजा समजून घेण्याची व्यवस्था असू शकते. मात्र त्याचा वापर विद्यार्थ्याला प्रवेश नाकारण्यासाठी किंवा त्याच्यावर शिक्का मारण्यासाठी होऊ नये. उलट ज्यांना अतिरिक्त आधाराची गरज आहे, त्यांच्यासाठी सुरुवातीपासून योग्य मार्गदर्शन, समुपदेशन आणि मेंटरशिप उपलब्ध करून देणे हा त्याचा उद्देश असावा. शिक्षणव्यवस्थेतील आणखी एक गंभीर प्रश्न म्हणजे 'यश मिळालेच पाहिजे', ही मानसिकता. एखाद्या अभ्यासक्रमात प्रवेश मिळाला म्हणजे तो कोणत्याही परिस्थितीत पूर्ण करावाच, अशी सक्ती विद्यार्थ्यांसाठी मानसिक ओझे ठरू शकते. आधुनिक शिक्षणव्यवस्थेने बहुपर्यायी मार्ग, अभ्यासक्रम बदलण्याची संधी, ब्रेक घेण्याची मुभा आणि सन्मानजनक पर्यायी शैक्षणिक मार्ग उपलब्ध करून दिले पाहिजेत. एखादा मार्ग आपल्यासाठी योग्य नाही हे लक्षात आल्यास बाहेर पडणे म्हणजे पराभव नाही, हा संदेश महत्त्वाचा आहे. या सगळ्या प्रक्रियेत विद्यार्थ्यांची परस्पर मदतही अत्यंत महत्त्वाची आहे. मित्राच्या वर्तनातील सूक्ष्म बदल शिक्षकांपेक्षा आधी त्याच्या सहकाऱ्यांच्या लक्षात येतात. त्यामुळे विद्यार्थी-नेतृत्वाखालील मानसिक आरोग्य गट, समवयस्क संवादमंडळे आणि विश्वासाचे अनौपचारिक व्यासपीठ निर्माण करणे उपयुक्त ठरू शकते. मानसिक आरोग्याविषयी बोलणे ही कमजोरी नसून धैर्याची बाब आहे, अशी संस्कृती निर्माण झाली पाहिजे. याचबरोबर शिक्षणसंस्थांनी विद्यार्थ्यांच्या जीवनाकडे केवळ गुण, पॅकेज, पदवी आणि कॅम्पस प्लेसमेंटच्या चष्म्यातून पाहणे थांबविले पाहिजे. मानवी मूल्याची किंमत गुणपत्रिका किंवा रँकिंगपेक्षा मोठी आहे, ही जाणीव विद्यार्थ्यांना देणारे सांस्कृतिक, क्रीडा, कलात्मक आणि मूल्याधिष्ठित उपक्रम वाढविणे गरजेचे आहे. आत्महत्येची घटना घडल्यानंतर संस्थेची जबाबदारी संपत नाही. शिक्षणसंस्था मानसोपचार रुग्णालये नाहीत, हे खरे; परंतु त्या विद्यार्थ्यांसाठी कोणते वातावरण निर्माण करतात, याची जबाबदारी त्यांचीच आहे. अनावश्यक दबाव, सामाजिक एकाकीपणा, कठोर आणि लवचिकतेचा अभाव असलेली शैक्षणिक रचना यावर संस्थांनी गांभीर्याने पुनर्विचार करायला हवा. आयआयटीसारख्या संस्थांचे ध्येय केवळ देशातील सर्वोत्तम अभियंते घडविणे नसावे; सक्षम, संवेदनशील आणि मानसिकदृष्ट्या सुदृढ नागरिक घडविणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. उत्कृष्टतेच्या शर्यतीत एखाद्या विद्यार्थ्याचे जीवनपणाला लागणार असेल, तर त्या उत्कृष्टतेच्या संकल्पनेचेच पुनर्मूल्यांकन करण्याची वेळ आली आहे. शिक्षणव्यवस्थेचे खरे यश किती विद्यार्थी सर्वोच्च स्थानावर पोहोचले यात नसून, किती विद्यार्थ्यांना अडचणीच्या काळातही सुरक्षितपणे पुढे जाण्याचा आधार मिळाला यात मोजले गेले पाहिजे अन्यथा शिक्षण व्यवस्था ही जीवघेणी ठरेल.

नव्या धोरणात प्राथमिक शिक्षणाचे वास्तव काय?

बदलत्या शिक्षणव्यवस्थेत बालकांच्या भविष्याचा प्रश्न

नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने भारतीय शिक्षणव्यवस्थेत परिवर्तनाची नवी दिशा दाखविली आहे.शिक्षण केवळ परीक्षेतील गुण, पाठांतर आणि प्रमाणपत्रापुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे माध्यम व्हावे, ही या धोरणामागील महत्त्वाची भूमिका आहे. बालकांच्या वयोगटानुसार शिक्षण, मातृभाषेतून अध्यापन, अनुभवाधारित अध्ययन, कौशल्यविकास आणि सर्जनशील विचारांना प्रोत्साहन अशा अनेक अपेक्षा या धोरणातून व्यक्त करण्यात आल्या आहेत.

मात्र, धोरणातील उद्दिष्टे आणि प्रत्यक्ष शाळेतील वास्तव यांच्यातील अंतर कमी झाले आहे काय? हा प्रश्न आज प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार शिक्षणाची रचना ५+३+३+४ अशी करण्यात आली आहे. त्यात वयाच्या तीन ते आठ वर्षांपर्यंतच्या बालकांच्या शिक्षणाला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. खेळ, कृती, गोष्टी, संवाद आणि अनुभव यांच्या माध्यमातून बालकांनी शिकावे, ही या रचनेची मध्यवर्ती संकल्पना आहे.

प्राथमिक शिक्षणाच्या पहिल्या टप्प्यात बालकाला अक्षरांची ओळख, अंकज्ञान, भाषिक समज आणि मूलभूत गणिती कौशल्ये प्राप्त होणे अपेक्षित आहे. परंतु ग्रामीण भागातील अनेक शाळांमध्ये आजही बालकांच्या अध्ययन क्षमतेतील विविधता, शिक्षकांची उपलब्धता, भौतिक सुविधांचा अभाव आणि घरातील शैक्षणिक वातावरण अशा बाबी शिक्षणाच्या गुणवत्तेवर परिणाम करतात.

शाळेत प्रवेश मिळणे ही शिक्षणाची सुरुवात आहे; परंतु प्रत्येक बालकाला अपेक्षित अध्ययन निष्पत्ती प्राप्त होणे, हेच शिक्षणाचे खरे यश आहे.

नव्या शैक्षणिक धोरणात प्राथमिक स्तरावर मातृभाषेतून किंवा स्थानिक भाषेतून शिक्षण देण्यावर भर देण्यात आला आहे.बालकाला परिचित भाषेतून शिकण्याची संधी मिळाल्यास त्याची समज, अभिव्यक्ती आणि विचारशक्ती विकसित होण्यास मदत होते. मात्र, मातृभाषेतून शिक्षण देणे म्हणजे केवळ पाठ्यपुस्तकाचे भाषांतर नव्हे.शिक्षकांनी बालकांच्या भाषिक अनुभवांचा उपयोग करून अध्यापन करणे, त्यांना प्रश्न विचारण्याची संधी देणे आणि स्वतःच्या शब्दांत विचार मांडण्यास प्रवृत्त करणे आवश्यक आहे.

आज इंग्रजी माध्यमाच्या आकर्षणामुळे अनेक पालक आपल्या पाल्याला इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश देण्यास प्राधान्य देतात. या परिस्थितीत मातृभाषेतील शिक्षणाचे महत्त्व पटवून देतानाच इंग्रजीसह अन्य भाषांचे ज्ञानही प्रभावीपणे विकसित करण्याची गरज आहे.

शैक्षणिक धोरणातील बदल प्रत्यक्ष वर्गात आणण्याची प्रमुख जबाबदारी शिक्षकांवर आहे. बालकेंद्रित शिक्षण, कृतीआधारित अध्यापन, अध्ययन निष्पत्ती, डिजिटल शिक्षण, मूल्यमापनातील बदल आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे सातत्यपूर्ण निरीक्षण अशा अनेक बाबी शिक्षकांना सांभाळाव्या लागतात. मात्र, शिक्षकांच्या अध्यापनाबरोबरच त्यांच्यावर विविध प्रशासकीय कामे, ऑनलाइन माहिती भरणे, अहवाल तयार करणे, सर्वेक्षणे आणि इतर अशैक्षणिक जबाबदाऱ्यांचा भार वाढत असल्याची वस्तुस्थिती नाकारता येत नाही. शिक्षकांचा अधिकाधिक वेळ वर्गाबाहेरील कामांत खर्च होत असेल, तर बालकांच्या अध्ययनासाठी आवश्यक असलेला प्रत्यक्ष वेळ कमी होतो. त्यामुळे शैक्षणिक गुणवत्तेचा विचार करताना शिक्षकांना पुरेसा अध्यापन वेळ, आवश्यक प्रशिक्षण आणि शैक्षणिक स्वातंत्र्य उपलब्ध करून देणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

नव्या शिक्षणव्यवस्थेत तंत्रज्ञानाला महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे. डिजिटल साधने, ऑनलाइन अध्ययनसाहित्य आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर शिक्षण अधिक प्रभावी करण्यासाठी उपयुक्त ठरू शकतो.परंतु ग्रामीण भागातील सर्व शाळांमध्ये इंटरनेट, संगणक, प्रोजेक्टर आणि आवश्यक तांत्रिक सुविधा समान प्रमाणात उपलब्ध आहेत का?प्रत्येक बालकाला डिजिटल साधनांचा वापर करण्याची संधी मिळते का? हे प्रश्नही महत्त्वाचे आहेत.तंत्रज्ञान हे शिक्षकांना पर्याय म्हणून नव्हे, तर अध्यापन अधिक समृद्ध करणारे साधन म्हणून वापरले पाहिजे. साधनांची उपलब्धता आणि त्यांचा योग्य वापर यांत समन्वय साधल्याशिवाय डिजिटल शिक्षणाचे उद्दिष्ट पूर्ण होऊ शकणार नाही.

आज शाळेच्या गुणवत्तेचे मूल्यमापन अनेकदा परीक्षेतील निकाल, पटसंख्या आणि विविध अहवालांच्या आधारे केले जाते. परंतु प्राथमिक शिक्षणाचा खरा दर्जा बालकाच्या वाचन क्षमतेत, लेखनातील अभिव्यक्तीत, गणिती समजुतीत, जिज्ञासेत आणि आत्मविश्वासात दिसून आला पाहिजे.एखाद्या विद्यार्थ्याला पाठांतर करून उत्तर लिहिता येते; परंतु त्याला त्या संकल्पनेचा अर्थ समजतो का? तो स्वतः प्रश्न विचारतो का? त्याला शिकलेल्या ज्ञानाचा दैनंदिन जीवनात उपयोग करता येतो का? हे प्रश्न अधिक महत्त्वाचे आहेत.शिक्षणाचा उद्देश केवळ परीक्षेत उत्तीर्ण होणारा विद्यार्थी घडविणे नसून विचार करणारा, समजून घेणारा आणि विवेकशील नागरिक घडविणे हा असला पाहिजे.

नव्या शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी काही मूलभूत बाबींवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.प्रत्येक प्राथमिक शाळेत पुरेसे शिक्षक उपलब्ध असावेत. शिक्षकांना नियमित आणि गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण मिळावे. शाळांमध्ये आवश्यक भौतिक सुविधा आणि अध्ययन साहित्य उपलब्ध असावे. विद्यार्थ्यांच्या अध्ययनातील अडचणी वेळेवर ओळखून त्यांना पूरक मार्गदर्शन मिळावे.

शिक्षणव्यवस्थेत पालक, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती आणि समाज यांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे. शिक्षण ही केवळ शिक्षकांची जबाबदारी नसून संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.

शिक्षणाचे भविष्य वर्गखोलीत घडते!म्हणून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हे प्राथमिक शिक्षणाच्या परिवर्तनासाठी महत्त्वपूर्ण संधी उपलब्ध करून देते. परंतु कोणतेही धोरण केवळ कागदावर सुंदर दिसून उपयोगाचे नाही. त्याची खरी कसोटी शाळेतील वर्गखोलीत, शिक्षकांच्या अध्यापनात आणि विद्यार्थ्यांच्या अध्ययनात लागते. ग्रामीण भागातील शेवटच्या विद्यार्थ्यापर्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षण पोहोचले, प्रत्येक बालकाला शिकण्याची समान संधी मिळाली आणि शिक्षणातून त्याच्या विचारशक्तीचा विकास झाला, तरच नव्या शैक्षणिक धोरणाचे स्वप्न साकार होईल.

शिक्षणव्यवस्थेतील बदलांचा केंद्रबिंदू शिक्षक, शाळा किंवा शासनाची प्रशासकीय यंत्रणा नसून बालक असले पाहिजे. बालकाच्या चेहऱ्यावर शिकण्याचा आनंद, डोळ्यांत जिज्ञासा आणि मनात आत्मविश्वास निर्माण झाला, तरच प्राथमिक शिक्षणाच्या गुणवत्तेचे खरे मोजमाप करता येईल. नवे शैक्षणिक धोरण म्हणजे केवळ शिक्षणाची नवी रचना नव्हे; तर बालकाच्या भविष्याकडे पाहण्याची नवी दृष्टी आहे. ही दृष्टी प्रत्यक्षात उतरविण्यासाठी धोरण, शिक्षक आणि शाळा यांच्यात समन्वय साधून प्राथमिक शिक्षणाचा पाया अधिक मजबूत करणे, हीच आजची खरी गरज आहे.

–पंडित पवळे
नांदेड

करिअर निवडताना मुलांचे स्वप्न की पालकांची अपेक्षा?

प्रत्येक पालकाचे आपल्या मुलाने आयुष्यात यशस्वी व्हावे, मोठे व्हावे आणि समाजात प्रतिष्ठा मिळवावी, असे स्वप्न असते. मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी पालक आपल्या इच्छा, गरजा आणि सुखसोयींचा त्याग करतात. मात्र, मुलांच्या करिअरचा प्रश्न निर्माण होतो, तेव्हा अनेकदा पालकांची स्वप्ने आणि मुलांच्या आवडी यांच्यात संघर्ष निर्माण होतो. डॉक्टर, अभियंता, प्रशासकीय अधिकारी किंवा मोठ्या कंपनीत उच्च पदावर काम करणारा अधिकारी व्हावे, अशी पालकांची अपेक्षा असते. परंतु मुलांना कला, क्रीडा, शेती, व्यवसाय, संगणक तंत्रज्ञान किंवा अन्य क्षेत्रांत करिअर घडवायचे असते. अशा वेळी महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो की, करिअर निवडताना मुलांच्या स्वप्नांना महत्त्व द्यायचे की पालकांच्या अपेक्षांनआजच्या स्पर्धेच्या युगात शिक्षण आणि करिअर यांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. चांगले गुण, प्रतिष्ठित महाविद्यालयातील प्रवेश आणि भरघोस पगाराची नोकरी म्हणजे यश, अशी एक संकुचित संकल्पना समाजात रूढ होत आहे. या विचारसरणीचा प्रभाव पालकांवरही पडतो.

आपल्या मुलाने इतरांच्या मुलांपेक्षा पुढे जावे, त्याला चांगली नोकरी मिळावी आणि समाजात मान-सन्मान मिळावा, या अपेक्षेतून पालक मुलांच्या करिअरचे निर्णय स्वतः घेऊ लागतात. मात्र, प्रत्येक मुलाची बुद्धिमत्ता, आवड, क्षमता आणि कल वेगवेगळा असतो. एखाद्या विद्यार्थ्याला विज्ञान विषयात रस असतो, तर दुसऱ्याला साहित्य, चित्रकला, संगीत किंवा क्रीडा क्षेत्राची आवड असते. काही मुलांमध्ये उद्योजक होण्याची क्षमता असते, तर काहींना शेती आणि कृषी तंत्रज्ञानाच्या माध्यमातून नावीन्यपूर्ण काम करण्याची इच्छा असते. या विविधतेचा स्वीकार करण्याऐवजी सर्व मुलांनी ठरावीक क्षेत्रांतच करिअर करावे, असा आग्रह धरल्यास त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासाला मर्यादा येऊ शकतातकरिअर निवडताना केवळ मुलांच्या स्वप्नांचा विचार करून चालणार नाही, तर पालकांच्या चिंताही समजून घेणे आवश्यक आहे. मुलांचे शिक्षण, त्यासाठी होणारा खर्च, भविष्यातील आर्थिक स्थैर्य आणि रोजगाराच्या संधी यांविषयी पालकांना काळजी वाटणे स्वाभाविक आहे. आयुष्यभराच्या अनुभवातून ते मुलांना सुरक्षित आणि



स्थिर भविष्य देण्याचा प्रयत्न करतातपरंतु सुरक्षित भविष्याची कल्पना केवळ पारंपरिक व्यवसायांपुरती मर्यादित ठेवणे योग्य नाही. काळानुसार रोजगाराच्या संधी बदलत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता, माहिती तंत्रज्ञान, डिजिटल माध्यमे, पर्यावरण संवर्धन, अन्नप्रक्रिया, कृषी उद्योजकता आणि कौशल्याधारित व्यवसाय अशा अनेक क्षेत्रांत नव्या संधी निर्माण होत आहेत. त्यामुळे करिअर निवडताना केवळ समाजातील प्रतिष्ठा किंवा पारंपरिक समजुती यांचा विचार न करता मुलांची क्षमता, संबंधित क्षेत्रातील संधी आणि भविष्यातील गरजा यांचा समतोल साधणे गरजेचे आहे.मुलांच्या करिअरचा निर्णय घेताना पालक आणि मुलांमध्ये मोकळा संवाद असणे अत्यंत आवश्यक आहे. मुलांना नेमके काय व्हायचे आहे, त्या क्षेत्राची त्यांना कितपत माहिती आहे, त्यासाठी कोणते शिक्षण आणि कौशल्ये आवश्यक आहेत, तसेच त्या क्षेत्रातील आव्हाने कोणती आहेत, यावर चर्चा झाली पाहिजम ुलांनीही केवळ आकर्षण किंवा मित्रांच्या प्रभावातून करिअर निवडू नये. स्वतःची क्षमता ओळखून, संबंधित क्षेत्राचा अभ्यास करून आणि आवश्यक मेहनत करण्याची तयारी ठेवून निर्णय घ्यावा.

पालकांनी मुलांना योग्य माहिती द्यावी, अनुभवी व्यक्तींशी संवाद साधण्याची संधी उपलब्ध करून द्यावी आणि आवश्यकतेनुसार करिअर समुपदेशकांची मदत घ्यावी. पालकांनी मुलांसाठी मार्गदर्शकाची भूमिका बजावावी; त्यांच्या आयुष्याचे निर्णय लादणारे नियंत्रक बनू नये. मुलांच्या स्वप्नांना वास्तवाची जोड देणे आणि वास्तवातील अडचणींवर मात करण्यासाठी त्यांना सक्षम करणे, हीच पालकांची खरी जबाबदारी आहअनेकदा पालकांच्या अपेक्षा पूर्ण करता आल्या नाहीत, तर मुलांना आपण अपयशी ठरलो आहोत, असे वाटू लागते. इतर मुलांशी तुलना, सतत टोमणे आणि गुणांवरून होणारी टीका यामुळे त्यांचा आत्मविश्वास कमी होऊ शकतो. करिअरच्या निवडीबाबतचा ताण त्यांच्या मानसिक स्वास्थ्यावरही परिणाम करू शकतो. प्रत्येक प्रयत्नात यश मिळेलच असे नाही. एखाद्या क्षेत्रात अपेक्षित यश मिळाले नाही, तर पर्यायी मार्ग शोधता येतात. अपयशातून शिकण्याची आणि नव्याने सुरुवात करण्याची संधी मुलांना मिळाली पाहिजे. पालकांनी मुलांच्या गुणपत्रिकेपेक्षा त्यांच्या प्रयत्नांना, जिज्ञासेला, प्रामाणिकपणाला आणि शिकण्याच्या वृत्तीला अधिक महत्त्व द्यावयशाची व्याख्या केवळ मोठा पगार, उच्च पद किंवा सामाजिक प्रतिष्ठा एवढीच मर्यादित नसावी. आपल्या आवडीच्या क्षेत्रात प्रामाणिकपणे काम करणे, आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होणे, समाजासाठी योगदान देणे आणि समाधानाने जीवन जगणे, हेही यशाचे महत्त्वाचे पैलू आहेत.

आज शिक्षण आणि करिअरच्या अनेक वाटा खुल्या झाल्या आहेत. पारंपरिक शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षण, कौशल्य विकास, स्वयंरोजगार आणि उद्योजकतेला महत्त्व प्राप्त होत आहे. त्यामुळे मुलांनी कोणते क्षेत्र निवडावे, यापेक्षा त्यांनी निवडलेल्या क्षेत्रात प्रगती करण्यासाठी आवश्यक कौशल्ये कशी विकसित करावीत, यावर अधिक भर देण्याची गरज आहशाळा आणि महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना लवकर वयातच विविध करिअरच्या संधींची ओळख करून द्यावी. विद्यार्थ्यांची अभिरुची आणि क्षमता ओळखण्यासाठी मार्गदर्शन उपलब्ध करून द्यावे. तसेच पालकांनाही करिअरमधील बदलत्या संधी आणि रोजगाराच्या नव्या स्वरूपाविषयी माहिती दिली पाहिजे. समाजानेही डॉक्टर, अभियंता किंवा प्रशासकीय अधिकारी यांच्यापुरते यश मर्यादित न ठेवता विविध क्षेत्रांत उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान केला पाहिजे. कोणतेही काम लहान नसते; त्या कामातील गुणवत्ता, प्रामाणिकपणा आणि सामाजिक योगदान महत्त्वाचे असते, ही जाणीव नव्या पिढीत रुजवणे आवश्यक करिअर निवडणे हा प्रत्येक मुलाच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा असतो. या टप्प्यावर पालकांचा अनुभव आणि मुलांची स्वप्ने यांचा संघर्ष होण्याऐवजी त्यांचा समन्वय साधला गेला पाहिजे. पालकांनी आपल्या अपूर्ण राहिलेल्या इच्छा मुलांवर लादू नयेत आणि मुलांनीही आपल्या आवडीच्या क्षेत्रातील वास्तव, जबाबदाऱ्या आणि आव्हाने समजून घेतली पाहिजेत.

मुलांच्या क्षमतेवर विश्वास ठेवून त्यांना योग्य दिशा देणे, त्यांच्या निर्णयांचा आदर करणे आणि अडचणीच्या काळात त्यांच्या पाठीशी उभे राहणे, हे पालकत्वाचे खरे यश आहे. मुलांनी आपल्या पायावर उभे राहावे, स्वतःच्या निर्णयांची जबाबदारी स्वीकारावी आणि आयुष्यात समाधान मिळवावे, यासाठी पालकांनी त्यांना स्वातंत्र्याबरोबर योग्य मार्गदर्शनही दिले पाहिजे.शेवटी, मुलांचे आयुष्य हे पालकांच्या स्वप्नांची पूर्तता करण्याचे साधन नसून मुलांनी स्वतःचे भविष्य घडवण्याची संधी आहे. स्वप्न मुलांचे असावे, त्याला दिशा देणारा अनुभव पालकांचा असावा आणि त्या स्वप्नांच्या पूर्ततेसाठी दोघांचीही साथ असावी. कारण मुलांवर अपेक्षांचे ओझे लादून नव्हे, तर त्यांच्या क्षमतेला प्रोत्साहन देऊनच उज्ज्वल भविष्याची पायाभरणी करता येते..

–प्रा. संजय बडे
दहेगाव ता. वैजापूर,
जि. छत्रपती संभाजीनगर
मो. ७८८८२९७८५९

शेतकरी जगला तर शेती टिकेल...

शेतकरी हा देशाचा अन्नदाता असून तो संपूर्ण देशाच्या अन्नाची गरज भागवतो. मात्र, आज भारतीय कृषी क्षेत्र अनेक समस्यांना सामोरे जात आहे. त्यामध्ये शेतकरी आत्महत्या ही अत्यंत गंभीर आणि चिंताजनक समस्या आहे. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधार आहे. परंतु निसर्गावर अवलंबून असलेली शेती, पावसाची अनिश्चितता, दुष्काळ, अतिवृष्टी, पिकांवरील रोग, वाढता उत्पादन खर्च आणि शेतीमालाला योग्य भाव न मिळणे यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडतो. अनेकदा कर्जाचा वाढता बोजा आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या यांमुळे शेतकऱ्यांवरील मानसिक ताण वाढतो. या परिस्थितीत काही शेतकरी टोकाचे पाऊल उचलतात. त्यामुळे शेतकरी आत्महत्यांचा प्रश्न केवळ कृषी क्षेत्रापुरता मर्यादित न राहता सामाजिक आणि आर्थिक समस्याही बनला आहे.

शेतकरी आत्महत्यांमागे अनेक कारणे आहेत. त्यांपैकी प्रमुख कारण म्हणजे शेतीतील अनिश्चितता. पाऊस वेळेवर न पडणे, दुष्काळ पडणे किंवा अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान होणे यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होते. शेतीसाठी घेतलेले कर्ज फेडणे कठीण होते. शेतीचा वाढता खर्च. बियाणे, खते, कीटकनाशके, मजुरी आणि सिंचन यासाठी मोठा खर्च करावा लागतो. परंतु बाजारात शेतीमालाला अपेक्षित भाव मिळेलच याची खात्री नसते. परिणाम, शेतकऱ्याच्या उत्पन्नात स्थिरता राहत नाही. तसेच, सिंचनाच्या अपुऱ्या सुविधा, आधुनिक तंत्रज्ञानाचा मर्यादित वापर, पीकविमा मिळण्यात येणाऱ्या अडचणी आणि कर्जपुरवठ्यातील समस्या यांमुळेही परिस्थिती गंभीर बनते. या आर्थिक अडचणींसोबत मानसिक ताण आणि सामाजिक दबाव यांचा परिणाम होतो. या समस्येवर उपाय करण्यासाठी शासन, समाज आणि शेतकरी या सर्वांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे.

शेतकऱ्यांना वेळेवर आणि सुलभ कर्जपुरवठा मिळाला पाहिजे. सिंचनाच्या सुविधा वाढवणे, जलसंधारण करणे, पीकविमा योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे आणि शेतीमालाला योग्य भाव मिळवून देणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचे प्रशिक्षण तसेच पुरक व्यवसायांसाठी प्रोत्साहन दिले पाहिजे. याशिवाय, शेतकऱ्यांना मानसिक आधार मिळणेही महत्त्वाचे आहे. अडचणीच्या काळात त्यांना कुटुंबीय, समाज आणि शासनाकडून मदत मिळाली पाहिजे. समुपदेशन आणि मदतसेवा सहज उपलब्ध करून दिल्यास शेतकऱ्यांना संकटाचा सामना करण्यास मदत होऊ शकते.

भारतीय कृषी क्षेत्रातील शेतकरी आत्महत्यांची समस्या ही अनेक आर्थिक, नैसर्गिक आणि सामाजिक कारणांमुळे निर्माण झाली आहे. या समस्येचे निराकरण करण्यासाठी केवळ आर्थिक मदत पुरेशी नाही, तर शेती अधिक शाश्वत आणि फायदेशीर बनवणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांना आर्थिक सुरक्षितता, योग्य बाजारभाव, आधुनिक तंत्रज्ञान आणि मानसिक आधार मिळणे गरजेचे आहे. शेतकरी हा देशाचा कणा आहे. शेतकरी सुखी आणि समृद्ध असेल तरच देशाची प्रगती अधिक भक्कम होईल. त्यामुळे शेतकऱ्यांच्या समस्या समजून घेऊन त्यांना योग्य मदत करणे ही शासनाबरोबरच संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे. शेतकरी वाचला, तर शेती वाचेल; शेती वाचली, तर देश समृद्ध होईल. या विचारातून शेतकऱ्यांच्या जीवनात आशा, सुरक्षितता आणि समृद्धी निर्माण करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

–श्रीकांत संभाजी मगर
नांदेड.
मो. ९६८९११७१६९

एकस्तर वेतनश्रेणीपासून पात्र शिक्षक वंचित?

किनवट (प्रतिनिधी)- जिल्हा परिषदेच्या शिक्षकांना आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रात काम करण्यासाठी विशेष वेतनश्रेणी म्हणून 'एकस्तर योजना' शासनाने सन २००२ पासून सुरू केली. या वेतनश्रेणीपासून पात्र लाभार्थी शिक्षक वंचित असून, अपात्र शिक्षकांना वेतनश्रेणीचा लाभ देण्यात आला आहे, असा आरोप पात्र शिक्षकांनी केला आहे.

शासन निर्णयात वेतनश्रेणी देण्याबाबत तरतुदींचा योग्य अन्वयार्थ स्पष्ट करणारे शासन परिपत्रक क्र. एस आरव्ही- २०२२/प्र.क्र.४८/ कार्यासन-१२, मंत्रालय मुंबई दि. २९ फेब्रुवारी २०२४ नुसार स्वयंस्पष्ट केलेले आहे. या सुधारित शासन निर्णयाचा आधार घेऊन किनवट तालुक्यातील शिक्षकांना एकस्तर वेतनश्रेणी देण्यासाठी गटशिक्षणाधिकारी कार्यालयाने जा.क्र. २२८ दि. १ मार्च २०२६ रोजी ४५४ शिक्षकांची संचिका गटविकास अधिकारी कार्यालयात दाखल केली होती. काही शिक्षक न्यायालयातही गेले होते. दरम्यान, जिल्हा परिषद नांदेडने दि. २९ फेब्रुवारी २०२४ च्या शासन निर्णयाच्या अंमलबजावणीबाबत ग्रामविकास विभागास मार्गदर्शन मागितले होते. किनवट-माहूरचे आ. भीमराव केराम यांनी मंत्रालयात पत्रव्यवहार केल्याने दि. १६ ऑक्टोबर २०२६ रोजी मार्गदर्शन पत्र जि. प. नांदेड येथे प्राप्त झाले. यामुळे किनवट व माहूर तालुक्यातील शिक्षकांना एकस्तर वेतनश्रेणी देण्याचा मार्ग मोकळा झाला.

मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. नांदेडकडून एकस्तरची अंमलबजावणी कशी करावी, याचे सविस्तर मार्गदर्शनपर पत्र येण्याअगोदरच किनवट बीडीओ व बीइओ यांनी ३२० शिक्षकांना जा.क्र. पंअनि/गशिअ/आस्था/ ११२६/ २०२६ दि. १९ ऑक्टोबर २०२६ रोजी एकस्तर वेतनश्रेणी घाईघाईने प्रदान केली.

उच्च न्यायालयाच्या आदेशांचे उल्लंघन

हे पत्र निर्गमित करताना संदर्भ क्र. ६ म्हणून उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथील याचिका क्र. ७५२४/ २०२६ चा निकाल (दि. १५ जुलै २०२६) दर्शवण्यात आला आहे. यापूर्वी मा. उच्च न्यायालय संदर्भ क्र. ६ नुसार गटविकास अधिकारी पं. स. किनवट यांच्या पत्राद्वारे गटशिक्षणाधिकाऱ्यांना असे आदेशित केले होते की, औरंगाबाद खंडपीठाच्या याचिकेत दिलेल्या निर्णयाची तत्काळ अंमलबजावणी करून एकस्तर पदोन्नती वेतनश्रेणी आणि अतिरिक्त घरभाडे भत्ता देणे अनुषंगाने आपल्या स्तरावरून नियमाप्रमाणे स्पष्ट अभिप्रायसह मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. नांदेड यांच्याकडे पुढील निर्णयास्तव प्रस्ताव सादर करण्यात यावा.

या पत्राचे अनुपालन गटशिक्षणाधिकारी नीलकंठ चेटले यांनी केलेले नाही. मग एकस्तरचे आदेश गटविकास अधिकारी कार्यालयाने कोणत्या आधारे निर्गमित केले? असा थेट सवाल शिक्षक विचारत आहेत. याचिकेत 'एकस्तर वेतनश्रेणी' व 'घरभाडे भत्ता' या दोन स्वतंत्र बाबी आहेत. मग घरभाडे भत्त्याचा प्रश्न मार्गी का नाही लागला? असा प्रश्न आहे. त्यामुळे उच्च न्यायालयाच्या आदेशांचे तंतोतंत पालन झाले नाही.

नियमांची पायमल्ली व अपात्रांना लाभ

दि. २९ फेब्रुवारी २०२४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार, ज्या शिक्षकांनी 'चट्टोपाध्याय वेतनश्रेणी'चा लाभ घेतला आहे, त्यांना एस -१४ वेतनश्रेणीचा लाभ देता येत नाही, असे नमूद असताना, शासन निर्णयाला बगल देऊन ज्यांनी चट्टोपाध्याय वेतनश्रेणी घेतली त्यांनाही ३२० च्या यादीमध्ये स्थान दिले गेले. यावरून परिविक्षाधीन गटशिक्षणाधिकारी नीलकंठ चटले यांनी व त्यांच्या कार्यालयाने गटविकास अधिकारी पं. स. किनवट यांची जाणीवपूर्वक फसवणूक करून दि. १९ ऑक्टोबर २०२६ चे आदेश निर्गमित केले, अशी चर्चा शिक्षक वर्तुळात सुरू आहे. परिविक्षाधीन कालावधीत शासन निर्णयाच्या विरोधात जाऊन काही चट्टोपाध्याय धारकांना एस-१४ वेतनश्रेणी दिली, याबद्दल सर्वत्र आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. एवढी गंभीर बाब टिपणी लिहिणाऱ्यांना आणि त्यानुसार आदेश पारित करणाऱ्यांना कशी समजली नाही, हे प्रशासनाच्या कर्तृत्वावर प्रश्न निर्माण करणारे आहे. शासनाची तिजोरी रिकामी करण्याचा हा डाव मानू नये का? अधिकाराचा गैरवापर नाही का? असे प्रश्न उपस्थित होत आहेत.

काही अपात्र शिक्षकांनी एस - १४ चा लाभ घेतला, तर अनेक पात्र शिक्षकांना गटशिक्षणाधिकारी व वरिष्ठ सहायकाने जाणीवपूर्वक वंचित ठेवल्याचा राग ३२० च्या यादीत स्थान न मिळालेल्या शिक्षकांत व्यक्त होत आहे. आता यावर जि. प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी काय निर्णय घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.

विष्णुपुरीत १५० दलघमी पाणी; तरीही जनावरे तहानलेली!

एमआयडीसीचा पाणीउपसा बंद करून शेतकरी व पशुधनासाठी तीन पाणीपाळ्या सोडण्याची विष्णुपुरी लाभार्थी संघर्ष समितीची मागणी

नांदेड (प्रतिनिधी)– विष्णुपुरी-अंतेश्वर-दिग्रस प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरलेले असून प्रकल्पात अंदाजे १५० दलघमी पाणी उपलब्ध असल्याचा दावा विष्णुपुरी प्रकल्प लाभार्थी संघर्ष समितीने केला आहे. एकीकडे प्रकल्पात पाणीसाठा उपलब्ध असताना दुसरीकडे ग्रामीण भागातील शेतकरी आणि पशुधनाला पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागत असल्याने समितीने आक्रमक भूमिका घेतली आहे.

उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन न झाल्यास मोठ्या प्रमाणात पाणी बाष्पीभवनामुळे वाया जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे नांदेड शहराच्या पिण्याच्या पाण्याची आवश्यक सुरक्षित व्यवस्था कायम ठेवून उर्वरित पाण्याचा उपयोग ग्रामीण भागातील पशुधन आणि शेतकऱ्यांच्या पिण्याच्या पाण्यासाठी करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

विष्णुपुरी प्रकल्पातून एमआय-डीसीकडून मोठ्या प्रमाणात पाणी उपसा सुरू असल्याचा आरोप समितीने केला आहे. उद्योगांसाठी पाणी उपलब्ध होते, मात्र त्याच प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील शेतकरी आणि पशुधनासाठी पाणी सोडताना प्रशासनाकडून निर्णय होत नाही, हा दुजाभाव असल्याची भावना ग्रामीण भागात निर्माण झाली आहे. शेतकरी आज केवळ शेतीसाठी पाणी मागत नाही. त्याच्या गोठ्यातील जनावरांसाठी पिण्याचे पाणी मागत आहे. जनावरांना पाणी मिळाले नाही तर दूध उत्पादन, पशुधनाचे आरोग्य आणि शेतकऱ्याची संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्था प्रभावित होते.

विष्णुपुरी कालव्यातून ग्रामीण भागातील शेतकरी आणि पशुधनासाठी तातडीने तीन पाणीपाळ्या सोडाव्यात, अशी मागणी समितीने केली आहे. तसेच ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची गरज पूर्ण होईपर्यंत एमआयडीसीचा पाणीउपसा तात्पुरता बंद करण्याची मागणी करण्यात आली आहे. नांदेड शहराच्या पिण्याच्या पाण्याची सुरक्षित व्यवस्था कायम ठेवून उर्वरित उपलब्ध पाण्याचे न्याय्य नियोजन करावे. बाष्पीभवनामुळे पाणी वाया जाण्यापेक्षा ते तहानलेल्या पशुधनासाठी आणि ग्रामीण जनतेसाठी वापरावे, असे समितीचे म्हणणे आहे.

या मागणीसाठी विष्णुपुरी प्रकल्प लाभार्थी संघर्ष समितीच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्याकडे तातडीच्या हस्तक्षेपाची मागणी करण्यात आली आहे. प्रकल्पात पाणी असूनही शेतकरी आणि पशुधन तहानलेले राहणे स्वीकारले जाणार नाही. उपलब्ध पाण्याचे न्याय्य नियोजन करून तीन पाणीपाळ्या मिळाल्याच पाहिजेत, अशी भूमिका समितीने मांडली आहे.

या मागणीसाठी प्रा. शिवाजी मोरे सोनखेडकर, शिवाजीराव पाटील दगडगावकर, त्र्यंबक पाटील जानापुरीकर, लिंगोजी पाटील हरबळकर, माधवराव देसाई, सुरेशराव बोरगावकर, काशिनाथ पाटील पळशीकर, देवराज देसाई, खुशाल पाटील दगडगावकर, रघुनाथराव मोरे आणि परमेश्वर मोरे यांनी पुढाकार घेतला आहे.

शेतकऱ्याच्या शेतासाठी नंतर पाणी द्या; पण आधी त्याच्या घरातील माणसाला आणि गोठ्यातील मुक्या जनावराला पिण्याचे पाणी द्या, पाणी उपलब्ध असताना त्याला तहानलेले ठेवणे हा प्रश्न केवळ पाणीवाटपाचा नसून मानवी आणि पशुधनाच्या जगण्याचा आहे, अशी भावना लाभार्थी शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

नायगाव तालुक्यात बँका आहेत, पण ग्राहकांसाठी स्वच्छतागृहांची वानवा!

महिला व ज्येष्ठ नागरिकांची गैरसोय; वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची मागणी

नायगाव (प्रतिनिधी)– नायगाव, नरसी, रामतीर्थ, गडगा, मांजरम, कुंटूर, बरबडा, लोहगाव व शंकरनगरसह तालुक्यातील विविध गावांमध्ये असलेल्या भारतीय स्टेट बँक, बँक ऑफ इंडिया, नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, महाराष्ट्र ग्रामीण बँक, बुलढाणा को-ऑपरेटिव्ह बँक, शंकर नागरी बँक आदी बँकांमध्ये ग्राहकांसाठी स्वच्छतागृहांची सुविधा नसल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. त्यामुळे बँकेत आर्थिक व्यवहारांसाठी येणाऱ्या नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

बँकांमध्ये दररोज शेकडो महिला, पुरुष, शेतकरी, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्य खातेदार विविध कामांसाठी येतात. मात्र, स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध नसल्याने विशेषतः महिला व ज्येष्ठ नागरिकांची कुचंबणा होत आहे. काही ठिकाणी स्वच्छतागृहासाठी दूरवर जावे लागत असल्याने ग्राहकांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे. अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी सुविधा असताना ग्राहकांना मात्र या मूलभूत सुविधेपासून वंचित राहावे लागत असल्याची खंत नागरिक व्यक्त करीत आहेत.

ग्राहकांच्या सुविधांकडे दुर्लक्ष का?

बँक व्यवस्थापनाने ग्राहकांच्या मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष न करता स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी आणि बसण्याची योग्य व्यवस्था उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. संबंधित बँकांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची तातडीने चौकशी करून ग्राहकांसाठी स्वच्छतागृहांची व्यवस्था करावी, अशी मागणी जोर धरत आहे, अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही नागरिकांकडून दिला जात आहे.

जय श्रीराम चौकात अपघात; गतिरोधक बसविण्याची मागणी

नांदेड (प्रतिनिधी)– वाडी बुद्रुक येथील तिरुमला नगर परिसरातील जय श्रीराम चौकात वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या चौकात तातडीने गतिरोधक बसवून आवश्यक त्या रस्ता-सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी मागणी परिसरातील गंगाधर देशमुख व नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

वाडी बुद्रुक परिसरातील तिरुमला नगर व यश नगरी येथील जय श्रीराम चौकात चार रस्ते एकत्र येतात. तसेच गुरुजी चौकाकडे जाणारा वळणाचा रस्ता धोकादायक असल्याने या ठिकाणी वारंवार छोटे-मोठे अपघात घडत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. या अपघातांमध्ये नागरिक, महिला, लहान मुले व ज्येष्ठ नागरिक जखमी झाल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

जय श्रीराम चौक परिसरात विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात ये-जा सुरू असते. याशिवाय काबरा नगर, तिरुमला नगर, यश नगरी, लईजाई नगरी व साफल्य नगर परिसरातील नागरिक मोर चौक, फरांदे नगरकडे जाण्यासाठी याच मार्गाचा वापर करतात. त्यामुळे चौकात वाहनांची सतत वर्दळ असते. अशा परिस्थितीत अपघाताचा धोका वाढत असून, भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.

या समस्येबाबत यापूर्वी वाडी बुद्रुक ग्रामपंचायतीला माहिती देण्यात आली होती; मात्र अद्याप ठोस कार्यवाही झालेली नसल्याचे नागरिकांनी निवेदनात म्हटले आहे. या ठिकाणी घडलेल्या अपघातांचे व्हीडीओ पुरावेही उपलब्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने या गंभीर समस्येची तातडीने दखल घेऊन संबंधित चौकाची प्रत्यक्ष पाहणी करावी, नियमानुसार गतिरोधक बसवावा आणि आवश्यक त्या रस्ता-सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

लव्हेकर हॉस्पिटल व स्टार स्पीच हिअरिंग सेंटरतर्फे आरोग्य शिबीर

नांदेड (प्रतिनिधी)– लव्हेकर हॉस्पिटल, वजिराबाद, नांदेड येथे रविवार, दि. १ नोव्हेंबर २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथील रोहन वाव्हळ श्रवण, वाचा दोष तज्ज्ञ यांच्या मार्फत बहीरेपणा तपासणी, उपचार, कानाची डिजीटल मशीन बसवणे तसेच वयोमानानुसार बहीरेपणा, कान दुखणे, पाणी येणे, कानात आवाज येणे इत्यादी आजारावर उपचार करण्यात येणार आहेत.

स्टार हेअरिंग सेंटर लव्हेकर हॉस्पिटल येथे मागील दोन वर्षांपासून अनेक रुग्णांना अत्याधुनिक डिजीटल, सेमी डिजीटल पद्धतीच्या मशीन बसवण्यात आल्या आहेत. यामध्ये १० ते ९० वयोगटातील रूग्णांचा समावेश आहे. यासाठी पूर्णपणे साऊंड प्रूफ पद्धतीची रूम तसेच प्रशिक्षित तज्ज्ञ यांची सेवा उपलब्ध आहे.

भोकर तालुक्यातील अनेक युवकांचा काँग्रेस पक्षात प्रवेश

भोकर (प्रतिनिधी)– देशातील लोकशाही संविधान वाचवण्यासाठी राहुल गांधी ज्या पद्धतीने संघर्ष करीत लढा देत आहेत, त्यांचा आदर्श घेत दिनांक २८ ऑक्टोंबर २०२६ रोजी भोकर तालुक्यातील अनेक युवकांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. भारतीय जनता पक्षाच्या अन्यायकारक कारभाराविरोधात तसेच गोरगरीब आणि सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी बालाजी गाडे पाटील सातत्याने आवाज उठवत आहेत. त्यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत या युवकांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष डॉ. विठ्ठल पावडे यांच्या हस्ते हा पक्षप्रवेश झाला. यावेळी काँग्रेस ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष यशपाल भिंगे, महिला विभागाच्या राष्ट्रीय सरचिटणीस डॉ. रेखाताई चव्हाण, जिल्हा उपाध्यक्ष तिरुपती कोंडेकर, ललिता कुंभार, भोकर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष गोविंद पाटील गौड आणि निळकंठ वर्षेवार, प्रमोद देशमुख, शफी इनामदार, आदिनाथ चिंताकुटे, सम्राट हिरे, राहुल पुरी, प्रल्हाद सुनकलेकर, संदीप सुरगुलवाड यांच्यासह अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

वाडी बुद्रुकच्या ग्रामीण रुग्णालयाला पद्मश्री शामराव कदम यांचे नाव द्या -डॉ. हंसराज वैद्य यांची मागणी

नांदेड (प्रतिनिधी)– नांदेड शहरालगतच्या वाडी बुद्रुक अर्थात पावडेवाडी येथे नव्याने उभारण्यात आलेल्या १०० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाला सहकार महर्षी पद्मश्री कै. शामराव कदम यांचे नाव देण्यात यावे, तसेच ज्येष्ठ महिला व पुरुष नागरिकांसाठी सर्व आवश्यक सोयी-सुविधांनीयुक्त स्वतंत्र विशेष कक्ष अथवा वार्ड निर्माण करण्यात यावा, अशी मागणी मराठवाडा प्रादेशिक विभाग फेस्कॉमचे अध्यक्ष डॉ. हंसराज वैद्य यांनी केली आहे.

या संदर्भात राज्य शासनाकडे निवेदन सादर करण्यात आले असून, रुग्णालयाच्या उद्घाटन सोहळ्यातच नामकरणाची अधिकृत घोषणा करण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे.

पावडेवाडी येथील या नूतन ग्रामीण रुग्णालयाचे उद्घाटन १ नोव्हेंबर २०२६ रोजी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या हस्ते होणार आहे.

या पार्श्वभूमीवर रुग्णालयाला कै. शामराव कदम यांचे नाव देण्याची मागणी पुढे आली आहे. त्यांच्या सामाजिक, सहकारविषयक आणि लोककल्याणकारी कार्याचा गौरव करण्यासाठी ही योग्य संधी असल्याचे डॉ. वैद्य यांनी नमूद केले.

सहकारासह विविध क्षेत्रांत मोलाचे योगदान

सहकारमहर्षी कै. शामराव कदम यांना पावडेवाडीसह ग्रामीण भागातील ज्येष्ठ नागरिकांविषयी विशेष आस्था, कणव आणि आदर होता. समाजातील सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी समजून घेत त्यांच्या कल्याणासाठी कार्य करण्याची त्यांची भूमिका राहिली. सहकार, कला, कृषी, आरोग्य, औद्योगिक, शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकासासह नेरली कुष्ठधाम तसेच खादी व ग्रामोद्योग अशा विविध क्षेत्रांत त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

सहकार क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्यामुळे नांदेड जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्याच्या विकासाला चालना मिळाली. विविध क्षेत्रांतील त्यांच्या योगदानाची दखल घेऊन केंद्र शासनाने त्यांना पद्मश्री पुरस्काराने गौरविले होते. त्यांच्या कार्याचा आणि समाजाप्रती असलेल्या बांधिलकीचा सन्मान करण्याच्या दृष्टीने ग्रामीण रुग्णालयाला त्यांचे नाव देणे उचित ठरेल, अशी भूमिका डॉ. वैद्य यांनी मांडली आहे.

लाईफ इज ए सेलेब्रेशन -शिवाजीराजे पाटील

नांदेड (प्रतिनिधी)– संघर्षाशिवाय मिळालेल्या मोठ्या विजयाचा आनंद काय कामाचा? जितका मोठा संघर्ष तितका विजयाचा आनंदोत्सव मोठा. संघर्षाला घाबरून मैदान सोडू नका आणि कशीही परिस्थिती असो मनाचा आनंद आणि चेहऱ्यावरील हास्य कधी गमावू नका. सकारात्मक विचारांनी मन, मनगट, मेंदू, मस्तक, मानसिकता सशक्त असणाऱ्यांसाठी जीवन हा एक उत्सव असतो, असे प्रतिपादन वीर भगतसिंग विद्यार्थी परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष इंजि. शिवाजीराजे पाटील बाभळीकर यांनी केले. कोनाळे कोचिंग क्लासेसच्या वतीने आयोजित आनंदी विद्यार्थीजीवन या विषयावरील प्रशिक्षण शिबिरात ते बोलत होते.

प्रा. व्ही. डी. कोनाळे, शिक्षणाधिकारी तानाजी भोसले, सीएमडी अनुसया कोनाळे, प्रा. दत्तात्रय बिरादार, प्रा. योगेश कन्हेरे यांच्या मार्गदर्शनाखाली तणावमुक्त विद्यार्थी जीवनासाठी उपयुक्त ठरलेल्या लाईफ इज ए सेलेब्रेशन सारख्या वास्तववादी ट्रेनिंगची आजच्या काळात खऱ्या अर्थाने गरज असल्याची प्रतिक्रिया उपस्थित विद्यार्थी मित्रमैत्रिणींनी व्यक्त केली.

आनंदी जीवन जगण्याचा मंत्र देण्यासाठी ब्रह्माकुमारी शिवानी दीदी १७ नोव्हेंबरला नांदेडमध्ये

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मैदानावर सायंकाळी आध्यात्मिक प्रवचन; सर्वांसाठी प्रवेश विनामूल्य

नांदेड (प्रतिनिधी)– तणावग्रस्त जीवनशैली, वाढती नकारात्मकता व दुष्काळसदृश्य प्रतिकूल परिस्थितीमुळे खचलेल्या मनांना सकारात्मकतेची नवी दिशा देण्यासाठी जगविख्यात आध्यात्मिक मार्गदर्शिका आणि प्रेरणादायी वक्त्या ब्रह्माकुमारी शिवानी दीदी प्रथमच १७ नोव्हेंबर रोजी नांदेडमध्ये येत आहेत. प्रतिकूल परिस्थितीतही 'खुशनुमा जीवन जीने की कला' अर्थात 'आनंदी, सुखी आणि समाधानी जीवन जगण्याची कला' या विषयावर त्या मार्गदर्शन करणार आहेत. नांदेडकरांसाठी ही एक महत्त्वपूर्ण आध्यात्मिक पर्वणीच ठरणार आहे.

कैलासनगर येथील ब्रह्माकुमारी केंद्राच्या (ओम शांती केंद्राच्या) सुप्रसिद्ध संचालिका ब्रह्माकुमारी शिवकन्या बहेन यांच्या अथक प्रयत्नांतून या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले आहे. केवळ त्यांच्याच आग्रहामुळे ब्रह्माकुमारी शिवानी दीदींनी नांदेडच्या जनतेसाठी वेळ दिला आहे. दिवाळीनंतर नांदेडकरांना मिळालेली ही एक अनमोल आध्यात्मिक भेट असल्याची भावना व्यक्त होत आहे.

मराठवाड्यातील दुष्काळ-सदृश परिस्थिती, आर्थिक विवंचना आणि सामाजिक अस्थिरतेचा सामान्य नागरिकांसह ज्येष्ठ नागरिकांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावरही विपरीत परिणाम होत आहे. विशेषतः विस्थापित ज्येष्ठ नागरिकांना अनेक संकटांचा सामना करावा लागत आहे. प्रतिकूल परिस्थितीत मानसिक स्थैर्य टिकवणे, तणावावर मात करणे आणि जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहणे, ही आजच्या काळाची महत्त्वाची गरज बनली आहे. अशा परिस्थितीत ब्रह्मा कुमारी शिवानी दीदींचे मार्गदर्शन हे नांदेड परिसरातील नागरिकांना मानसिक बळ आणि जगण्याची नवी उभारी, उर्मी तथा उमेद देणारी ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

इसापूर उजव्या कालव्याचे रब्बी व उन्हाळी हंगामासाठी सिंचन नियोजन जाहीर

नांदेड (प्रतिनिधी)– उर्ध्व पैनगंगा प्रकल्पांतर्गत इसापूर उजव्या कालव्याद्वारे सन २०२६-२७ या वर्षातील रब्बी व उन्हाळी हंगामासाठी प्राथमिक सिंचन कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार दोन्ही हंगामांत प्रत्येकी दोन पाणीपाळ्या सोडण्याचे नियोजन करण्यात आले असून, रब्बी हंगामातील पहिली पाणीपाळी १ नोव्हेंबर २०२६ पासून सुरू होणार आहे. सिंचनासाठी पाणी घेऊ इच्छिणाऱ्या लाभधारकांनी नमुना क्रमांक ७ व ७-अ मध्ये पाणी मागणी अर्ज भरून संबंधित शाखा कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन उर्ध्व पैनगंगा प्रकल्प विभाग क्रमांक १, नांदेड यांच्यातर्फे करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाच्या दि. ५ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या आदेशानुसार अल निनोच्या संभाव्य प्रभावाच्या पार्श्वभूमीवर ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत पिण्याच्या पाण्यासाठी आरक्षण करण्यात आले आहे. त्यानंतर उपलब्ध राहणाऱ्या पाणीसाठ्याच्या आधारे रब्बी व उन्हाळी हंगामाचा प्राथमिक सिंचन कार्यक्रम निश्चित करण्यात आला आहे. धरण जलाशय, अधिसूचित नदी-नाले आणि मुख्य कालव्यावरील मंजूर उपसा सिंचनयोजनांच्या लाभधारकांनाही या नियोजनानुसार पाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

सन २०२६-२७ मधील रब्बी व उन्हाळी हंगामातील पाणीपाळ्यांचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे.

रब्बी हंगाम २०२६-२७ साठी पहिली पाणीपाळी दि. १ नोव्हेंबर ते २४ नोव्हेंबर २०२६ (२४ दिवस), दुसरी पाणीपाळी दि. २० डिसेंबर २०२६ ते १३ जानेवारी २०२७ (२४ दिवस) याप्रमाणे राहील.

'राष्ट्रीय जंतनाशक मोहीम' शाहू महाराज विद्यालयात संपन्न

भोकर (प्रतिनिधी)– 'राष्ट्रीय जंतनाशक मोहीम दिना'निमित्त वय वर्षे १ ते १९ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांना गोळ्यांचे वाटप करण्यात आले.

ग्रामीण रुग्णालय भोकर व तालुका आरोग्य अधिकारी भोकर यांच्या अंतर्गत जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनुपमा शिंदे, डॉ. राजाभाऊ बुट्टे निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्य), वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रताप चव्हाण व तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संदेश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली 'राष्ट्रीय जंतनाशक मोहीम' दिनानिमित्त श्री शाहू महाराज महाविद्यालय, भोकर येथे विद्यार्थ्यांना जंतनाशक मोहिमेविषयी मार्गदर्शन करून गोळ्या खाऊ घातल्या.

यावेळी आरबीएसकेचे जिल्हा समन्वयक अनिल कांबळे यांनी महाविद्यालयास भेट देऊन विद्यार्थ्यांना जंतनाशक गोळ्यांचे वाटप करून सेवन करायला लावले. यावेळी आरबीएसके पथकाचे डॉ. वेंकटेश टाकळकर, डॉ. ज्योती येन्नावार, डॉ. अपर्णा जोशी, औषध निर्माण अधिकारी संदीप ठाकूर, गिरी रावलोड, योगेश पवार आरोग्य सेवक, आरकेएसके समुपदेशक सुरेश डुमलवाड, वागतकर सिस्टर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांचे आरोग्य उत्तम राखणे व जंतसंसर्गापासून संरक्षण करणे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

अंतर्मन

31 ऑक्टोबरनंतर सिंह राशीच्या व्यक्तींच्या अडचणी वाढणार?

गुरूच्या गोचराचे आरोग्य, कुटुंब, आर्थिक स्थिती अन् नोकरीवर असे होतील परिणाम...

ज्योतिषशास्त्रीय अंदाजानुसार, सिंह राशीच्या व्यक्तींसाठी गुरूचे गोचर काही बाबतींत आव्हानात्मक ठरू शकते. आरोग्य, कौटुंबिक संबंध, आर्थिक व्यवहार आणि नोकरी-व्यवसायाच्या क्षेत्रांत सावधगिरी बाळगण्याचा सल्ला दिला जात आहे. मात्र, विवाहेच्छुक व्यक्ती आणि संततीप्राप्तीची इच्छा असलेल्या दांपत्यांसाठी काही सकारात्मक शक्यताही वर्तवण्यात आल्या आहेत.

आरोग्याच्या बाबतीत काळजी घेण्याचा सल्ला

ज्योतिषीय मान्यतेनुसार, गुरूचे जन्मराशीवरील गोचर प्रतिकूल मानले जाते. या काळात शारीरिक त्रासांसोबतच मानसिक तणाव वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पोटाचे किंवा हृदयाशी संबंधित आजार असलेल्या व्यक्तींनी आपल्या आरोग्याकडे विशेष लक्ष द्यावे, असा सल्ला देण्यात आला आहे. मात्र, ग्रहांच्या गोचरामुळे आजार होतात किंवा वाढतात, याला वैज्ञानिक आधार नाही. कोणतीही आरोग्यविषयक समस्या जाणवल्यास वैद्यकीय तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

कौटुंबिक वातावरणात तणावाची शक्यता

कौटुंबिक सुखाच्या दृष्टीने हा काळ आव्हानात्मक ठरू शकतो, असे ज्योतिषीय भाकीत आहे. घरातील मतभेद, नातेसंबंधांमधील तणाव आणि नातेवाइकांशी संबंधित समस्यांमुळे मन अस्वस्थ राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. अपेक्षित मान-सन्मान न मिळाल्याची भावना निर्माण होऊ शकते. सामाजिक प्रतिष्ठेबाबतही काही व्यक्तींना निराशेचा सामना करावा लागू शकतो. अशा परिस्थितीत संयम राखणे, संवादातून मतभेद सोडवणे आणि भावनेच्या भरात निर्णय घेणे टाळणे हिताचे ठरेल. दुसरीकडे, विवाहाची प्रतीक्षा करणाऱ्या व्यक्तींसाठी विवाहाचे योग जुळून येण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तसेच संततीप्राप्तीची इच्छा असलेल्या दांपत्यांसाठीही अनुकूल काळ असल्याचे ज्योतिषीय अंदाजात म्हटले आहे. धार्मिक आणि परोपकारी कार्यांमधील सहभाग वाढू शकतो.

आर्थिक स्थितीवर परिणाम होण्याची शक्यता

आर्थिक बाबतीतही सावधगिरी बाळगण्याचा सल्ला देण्यात आला आहे. अचानक उद्भवणारे खर्च आणि उत्पन्न मिळण्यात येणारे अडथळे यामुळे आर्थिक नियोजन बिघडू शकते, असे ज्योतिषीय भाकीत आहे. या काळात अनावश्यक खर्च टाळून बचतीला प्राधान्य द्यावे. पुरेशी माहिती न घेता जोखमीच्या गुंतवणुकीचे निर्णय घेऊ नयेत. लॉटरी, सट्टा किंवा इतर सट्टाधारित व्यवहारांपासून दूर राहावे. कर्ज घेताना परतफेडीची क्षमता तपासावी. कोणालाही पैसे उधार देताना व्यवहारातील जोखीम लक्षात घ्यावी. शेअर बाजारातील गुंतवणूक केवळ ग्रहस्थितीच्या आधारे ठरवू नये. गुंतवणुकीपूर्वी आर्थिक परिस्थिती, जोखीम सहन करण्याची क्षमता आणि संबंधित साधनांची माहिती विचारात घ्यावी.

नोकरीत कामाचा ताण वाढण्याची शक्यता

नोकरी करणाऱ्या व्यक्तींना कामाचा अतिरिक्त भार, वरिष्ठांशी मतभेद किंवा सहकाऱ्यांकडून अपेक्षित सहकार्य न मिळण्याचा अनुभव येऊ शकतो, असे ज्योतिषीय अंदाजात नमूद करण्यात आले आहे. काही व्यक्तींच्या बाबतीत बदलीची शक्यताही वर्तवण्यात आली आहे. खासगी क्षेत्रात काम करणाऱ्यांना नोकरीतील अनिश्चिततेची चिंता सतावू शकते. अशा परिस्थितीत कामाचे नियोजन व्यवस्थित करणे, कार्यालयातील संवाद सुधारण्याचा प्रयत्न करणे आणि व्यावसायिक कौशल्ये वाढवण्यावर भर देणे फायदेशीर ठरू शकते. केवळ ज्योतिषीय भाकितामुळे नोकरी सोडणे किंवा करिअरविषयक मोठा निर्णय घेणे टाळावे.

व्यावसायिकांनी सावधगिरी बाळगावी

व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींसाठीही हा काळ फारसा अनुकूल नसल्याचे ज्योतिषीय भाकीत आहे. नवीन क्षेत्रांत व्यवसायाचा विस्तार करताना अडचणी येऊ शकतात. सरकारी नियम, धोरणांमधील बदल किंवा प्रशासकीय प्रक्रियांमुळे काही व्यावसायिक प्रश्न निर्माण होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे व्यावसायिकांनी सध्याचा व्यवसाय स्थिर ठेवण्यावर भर द्यावा. मोठ्या विस्तारापूर्वी बाजारपेठेचा अभ्यास करावा. जोखमीचे व्यवहार आणि अविचारी आर्थिक निर्णय टाळावेत. उधारीचे व्यवहार करताना योग्य नोंदी व परतफेडीची खात्री ठेवावी. सरकारी कामकाजाशी संबंधित कागदपत्रे आणि नियमांचे पालन करावे. व्यवसायातील निर्णय घेताना प्रत्यक्ष बाजारपेठेची परिस्थिती, उपलब्ध भांडवल आणि भविष्यातील मागणी यांचा विचार करणे अधिक महत्त्वाचे आहे.

स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांनी काय करावे?

स्पर्धापरीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीही हा काळ आव्हानात्मक ठरू शकतो, असे ज्योतिषीय भाकीत आहे. अभ्यासात व्यत्यय येणे किंवा अपेक्षेप्रमाणे निकाल न लागल्याने निराशा वाटणे, अशा शक्यता व्यक्त करण्यात आल्या आहेत. मात्र, नियमित अभ्यास, वेळेचे योग्य नियोजन, सराव परीक्षा आणि स्वतःच्या प्रगतीचे मूल्यमापन यांवर लक्ष केंद्रित केल्यास तयारी अधिक प्रभावी करता येते. ग्रहस्थितीच्या अंदाजामुळे आत्मविश्वास कमी होऊ देऊ नये.

घरातील नकारात्मकता दूर करण्यासाठी सोपे उपाय

सकारात्मकता अन् मन :शांतीसाठी जाणून घ्या तज्ज्ञांचा सल्ला...

घर म्हणजे केवळ चार भिंती, दरवाजे आणि खिडक्या नव्हेत. दिवसभराच्या धावपळीनंतर मनाला शांतता, विश्रांती आणि सुरक्षिततेची भावना देणारे ते आपले हक्काचे ठिकाण असते. घरात प्रसन्न, स्वच्छ आणि आनंददायी वातावरण असणे महत्त्वाचे मानले जाते. वास्तुशास्त्रानुसार घराची रचना, दिशांची मांडणी आणि परिसरातील स्वच्छता यांचा घरातील वातावरणावर परिणाम होतो, अशी पारंपरिक धारणा आहे. घरात अस्वस्थता किंवा तणाव जाणवत असल्यास काही साधे बदल करून वातावरण अधिक प्रसन्न बनवता येऊ शकते. वास्तुशास्त्रतज्ज्ञांनी घरातील नकारात्मकता कमी करण्यासाठी आणि सकारात्मक वातावरण निर्माण करण्यासाठी काही उपाय सुचवले आहेत...

या गोष्टींकडे लक्ष द्यावे...

» स्वच्छता आणि प्रकाश : घरातील प्रत्येक कोपरा स्वच्छ ठेवावा. विशेषतः घराचा मध्यवर्ती भाग, उत्तर आणि पूर्व दिशा तसेच मुख्य प्रवेशद्वाराजवळ पुरेसा प्रकाश असावा. नैसर्गिक प्रकाश कमी असल्यास योग्य कृत्रिम प्रकाशाची व्यवस्था करावी.

» घरातील तणाव : घरात प्रवेश केल्यानंतर वारंवार चिडचिड होणे किंवा कुटुंबीयांमध्ये वाद होणे यामागे संवादाचा अभाव, कामाचा ताण किंवा इतर वैयक्तिक कारणे असू शकतात. कुटुंबातील सदस्यांमध्ये मोकळा संवाद, परस्पर समजूतदारपणा आणि आदर राखणे महत्त्वाचे आहे.

» आर्थिक अडचणी : वास्तुशास्त्रात उत्तर दिशा आर्थिक संधींशी, तर पूर्व दिशा नवीन सुरुवात आणि सामाजिक संबंधांशी जोडली जाते. या दिशांमधील जागा स्वच्छ, प्रकाशमान आणि हवेशीर ठेवण्याचा सल्ला दिला जातो. मात्र, आर्थिक प्रगतीसाठी योग्य नियोजन, बचत आणि व्यावहारिक निर्णय अधिक महत्त्वाचे आहेत.

घरात वास्तुदोष मानल्या जाणाऱ्या बाबींकडे लक्ष द्या

» विस्कळीतपणा : घरात अनावश्यक वस्तूंचे ढीग, धूळ साचलेली विद्युत उपकरणे आणि वाळलेली झाडे ठेवू नयेत. गरज नसलेल्या वस्तू काढून टाकाव्यात.

» ओलावा आणि अंधार : गळणारे नळ, ओलसर भिंती, बुरशी आणि अंधारे कोपरे यांकडे दुर्लक्ष करू नये. या समस्या वेळेवर दुरुस्त केल्याने घराची स्वच्छता आणि आरोग्य राखण्यास मदत होते. वास्तुशास्त्रात पाण्याची गळती आर्थिक नुकसानाशी जोडली जाते; मात्र, त्याला वैज्ञानिक आधार असल्याचे सिद्ध झालेले नाही.

» प्रवेशद्वार : मुख्य दरवाजा स्वच्छ आणि सुस्थितीत असावा. दरवाजासमोर चपला, अनावश्यक सामान किंवा इतर अडथळे ठेवू नयेत. दरवाजा उघडताना आवाज होत असल्यास त्याची दुरुस्ती करावी.

घरातील नकारात्मकता कमी करण्यासाठी सोपे उपाय

» खडे मीठ ठेवण्याची पारंपरिक पद्धत : घरातील किंवा स्नानगृहातील काही ठिकाणी काचेच्या भांड्यात खडे मीठ ठेवण्याची प्रथा आहे. वास्तुशास्त्रात मीठ नकारात्मक ऊर्जा शोषून घेते, अशी धारणा आहे. मात्र, याला ठोस वैज्ञानिक पुरावा उपलब्ध नाही. मीठ ओलसर झाले किंवा घट्ट झाले तर ते बदलावे. त्याचबरोबर संबंधित जागा स्वच्छ आणि हवेशीर ठेवावी.

» कापूर आणि लवंग यांचा वापर : कापूर किंवा लवंग जाळणे, तसेच चंदन, लॅव्हेंडर, लेमनग्रास किंवा रोझमेरीसारख्या सुगंधांचा वापर करणे ही वातावरण प्रसन्न करण्याची पारंपरिक पद्धत आहे. मात्र, धूर किंवा सुगंधी पदार्थांमुळे काही व्यक्तींना त्रास होऊ शकतो. त्यामुळे खोलीत पुरेशी हवा खेळती ठेवावी आणि जळणारे पदार्थ कधीही दुर्लक्षित ठेवू नयेत. सकाळी पूर्व किंवा ईशान्य दिशेच्या खिडक्या उघडल्याने सूर्यप्रकाश आणि ताजी हवा घरात येऊ शकते.

» घराची स्वच्छता आणि दुरुस्ती वेळेवर करा : घरातील अनावश्यक वस्तू काढून टाकणे आणि प्रत्येक वस्तू व्यवस्थित ठेवणे यामुळे घर अधिक मोकळे व प्रसन्न वाटते. गळती, ओलावा, भिंतींना पडलेल्या भेगा आणि इतर दुरुस्तीची कामे वेळेवर पूर्ण करावीत. घराचा मध्यवर्ती भाग शक्यतो मोकळा ठेवावा. अतिरिक्त फर्निचर किंवा अनावश्यक सामानामुळे या जागेत अडथळे निर्माण होणार नाहीत, याची काळजी घ्यावी.

» मुख्य प्रवेशद्वाराचे महत्त्व : वास्तुशास्त्रात मुख्य प्रवेशद्वाराला विशेष महत्त्व दिले जाते. त्यामुळे दरवाजा स्वच्छ, सुस्थितीत आणि पुरेशा प्रकाशात असावा. पारंपरिक श्रद्धेनुसार, दरवाजाजवळ स्वस्तिक किंवा 'ॐ' यांसारखी शुभचिन्हे लावली जातात. काही जण दरवाजावर वास्तुपिरॅमिडही लावतात. या गोष्टींमुळे सकारात्मक ऊर्जा वाढते, ही धार्मिक किंवा पारंपरिक धारणा आहे; त्याला वैज्ञानिक पुष्टी मिळालेली नाही.

पंचमहाभूतांचे संतुलन राखण्यासाठी उपाय

» पृथ्वी तत्त्व : तुळस किंवा मनी प्लँटसारखी रोपे योग्य प्रकाश आणि देखभाल मिळेल अशा ठिकाणी ठेवावीत. उत्तर किंवा पूर्व दिशेला रोपे ठेवण्याची शिफारस वास्तुशास्त्रात केली जाते.

» जलतत्त्व : वास्तुशास्त्रानुसार उत्तर दिशेला पाण्याचा छोटा कारंजा ठेवण्याचा सल्ला दिला जातो. कारंज्यातील पाणी स्वच्छ ठेवणे आणि पाण्याचा अपव्यय टाळणे आवश्यक आहे.

» अग्नितत्त्व : दक्षिण-पूर्व दिशेला अग्नीशी संबंधित मानले जाते. या ठिकाणी संध्याकाळी दिवा लावण्याची पारंपरिक प्रथा आहे. दिवा लावताना आगीपासून सुरक्षिततेची काळजी घ्यावी.

» ध्वनीचे महत्त्व : शंखनाद, मंत्रोच्चार किंवा ध्यानधारणेमुळे मन शांत होण्यास मदत होऊ शकते. सकाळी 'ॐ' किंवा गायत्री मंत्राचा जप केल्याने काही व्यक्तींना एकाग्रता आणि मानसिक शांतता अनुभवता येते.

घर प्रसन्न ठेवण्यासाठी कोणत्या गोष्टी महत्त्वाच्या?

वास्तुशास्त्र हे भारतीय परंपरेतील निवासरचनेशी संबंधित शास्त्र आहे. घरात अस्वस्थता किंवा तणाव जाणवत असल्यास केवळ वास्तुदोष शोधण्याऐवजी त्यामागील व्यावहारिक कारणेही समजून घेणे आवश्यक आहे. घर स्वच्छ ठेवणे, पुरेसा सूर्यप्रकाश आणि हवा मिळण्याची व्यवस्था करणे, ओलावा व गळती दूर करणे आणि कुटुंबातील सदस्यांमध्ये सुसंवाद राखणे या गोष्टींना प्राधान्य द्यावे. घरातील वस्तू कोणत्या दिशेला ठेवाव्यात, यापेक्षा घराचे आरोग्यदायी, सुरक्षित आणि आरामदायी वातावरण टिकवून ठेवणे अधिक महत्त्वाचे आहे. वास्तुशास्त्रातील पारंपरिक उपाय श्रद्धेचा भाग म्हणून करता येतात; मात्र, त्यातून नकारात्मक ऊर्जा दूर होते किंवा आर्थिक प्रगती निश्चित होते, असे मानण्यासाठी ठोस वैज्ञानिक पुरावे उपलब्ध नाहीत. स्वच्छता, योग्य देखभाल आणि आनंदी कौटुंबिक वातावरण यांच्या मदतीने घर अधिक शांततादायी आणि प्रसन्न बनवता येऊ शकते.

माणसाने कितीही प्रयत्न केले तरी बदलता येत नाही नियतीची गती !

माणूस आपल्या आयुष्यात अनेक स्वप्ने पाहतो, विविध योजना आखतो आणि भविष्य आपल्या इच्छेनुसार घडवण्याचा प्रयत्न करतो. मात्र, नियतीचा प्रवास तिच्या गतीने सुरू असतो. माणूस आपल्या कर्तृत्वाने आणि प्रयत्नांनी जीवनातील अनेक परिस्थिती बदलू शकतो; परंतु काही घटना अशा असतात, ज्यांना आपल्या इच्छेनुसार वळण देणे शक्य होत नाही. आयुष्यातील अनेक गोष्टी आपल्या नियंत्रणाबाहेर असल्या, तरी त्यांना आपण कसे सामोरे जातो, हे मात्र आपल्या हातात असते...

कर्म करा, पण नियतीचा स्वीकार करायला शिका...

या बोधकथेचा आशय असा की, माणूस आयुष्यभर आपल्या इच्छेनुसार परिस्थिती घडवण्याचा प्रयत्न करतो. अनेकदा त्याच्या प्रयत्नांना यश मिळते, तर कधी कितीही प्रयत्न करूनही अपेक्षित परिणाम मिळत नाही. अशा वेळी निराश होण्याऐवजी परिस्थितीचा स्वीकार करून पुढे जाणे महत्त्वाचे ठरते. माणसाच्या हातात प्रयत्न करणे, योग्य निर्णय घेणे आणि संकटांना धैर्याने सामोरे जाणे असते. भविष्य नेमके कसे घडेल, यावर मात्र त्याचे संपूर्ण नियंत्रण नसते. म्हणूनच प्रयत्न सोडून देणे हा नियतीचा स्वीकार नव्हे, तर प्रतिकूल परिस्थितीतही धैर्य न गमावता आपले कर्तव्य करत राहणे, हाच खरा जीवनमंत्र आहे. नियतीवर विश्वास ठेवताना कर्माचा मार्ग सोडू नका; कारण उद्याचे भविष्य आपल्या हातात नसले, तरी आजचा प्रयत्न नक्कीच आपल्या हातात आहे.

नियतीची गती कोण बदलू शकतो?

नियतीने जे ठरवले, तेच घडते, अशी धारणा भारतीय तत्त्वज्ञानात आढळते. कर्म, काळ आणि नियती यांचा परस्परसंबंधही अत्यंत गूढ मानला जातो. या संदर्भात एक बोधकथा सांगितली जाते. एकदा एक प्रसिद्ध संन्यासी भिक्षेत मिळालेले अन्न घेऊन स्मशानभूमीत पोहोचले. तेथे त्यांनी तीन दगड गोळा करून त्यांची चूल तयार केली आणि त्यावर भात शिजवण्यासाठी भांडे ठेवले. त्यानंतर ते निश्चिंतपणे भजनात तल्लीन झाले. अचानक स्मशानभूमीत भयंकर गर्जना ऐकू आली. काही क्षणांतच एक गंभीर आवाज घुमला, "तू कोण आहेस? येथून निघून जा. आता या ठिकाणी स्मशानकालीचे अनुचर नृत्य करणार आहेत." संन्यासी मात्र अजिबात विचलित झाले नाहीत. ते शांतपणे म्हणाले, "तुम्हाला कोणी रोखले आहे? एवढी मोठी जागा आहे. तुम्ही कुठेही नृत्य करू शकता." त्यावर आवाज आला, "आम्ही माणसांसमोर नृत्य करत नाही. त्यामुळे तू येथून निघून जा." संन्याशांनी शांतपणे उत्तर दिले, "जिथे माणूस नसेल, अशा ठिकाणी जाऊन नृत्य करा." आवाज पुन्हा घुमला, "आम्ही तर याच ठिकाणी नृत्य करतो." संन्यासी म्हणाले, "मग आज नका करू. उद्या करा." यावर तो आवाज अधिकच संतापला. "याच ठिकाणी दररोज नृत्य करणे हा आमचा नियम आहे," असे त्याने ठणकावून सांगितले. संन्यासी म्हणाले, "माझाही एक नियम आहे. जिथे इच्छा होईल, तिथे मी भोजन करतो आणि तिथेच विश्रांती घेतो." संन्याशांचा निर्धार पाहून भुतगण संतापले. त्यांनी त्यांना घाबरवण्याचे आणि त्रास देण्याचे अनेक प्रयत्न केले; परंतु संन्यासी आपल्या जागेवरून तसूभरही हलले नाहीत. अखेरीस स्वतः स्मशानकाली प्रकट झाली. ती म्हणाली, "महात्मन्, आम्ही तुमच्यापुढे हरलो. आता आम्ही येथून निघून जातो. मात्र, आमचा आणखी एक नियम आहे. जो मनुष्य आमच्यासमोर येतो, त्याला आम्ही एकतर शाप देतो किंवा वरदान देतो." संन्यासी शांतपणे म्हणाले, "मला तुमच्या शापाची भीती नाही आणि तुमच्या वरदानाची अपेक्षाही नाही. मात्र, तुम्हाला माझ्यावर कृपा करायची असेल, तर माझा मृत्यू नेमका कधी होणार आहे, एवढेच सांगा." स्मशानकालीने त्यांना त्यांच्या मृत्यूची निश्चित तारीख आणि वेळ सांगितली. संन्याशांनी पुन्हा प्रश्न केला, "माझा मृत्यू ठरलेल्या तारखेच्या एक दिवस आधी किंवा एक दिवस नंतर घडवून आणणे तुम्हाला शक्य आहे का?" त्यावर स्मशानकाली म्हणाली, "ते माझ्या अधिकारात नाही. माणसाचा मृत्यू ज्या तिथीला आणि ज्या वेळी नियोजित असतो, त्याच वेळी होतो." हे ऐकून संन्यासी म्हणाले, "हेच तर मला आधीपासून माहीत होते. नियतीची गती माणसाला आपल्या इच्छेनुसार बदलता येत नाही."

युती टिकवायची की तोडायची भाजपने ठरवावं; शिवसेना आ. अब्दुल सत्तार यांचे आव्हान

नवी दिल्ली (प्रतिनिधी)– दिल्ली : विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाचा निकाल लागल्यावर आता महायुतीतच वादाचा धुरळा उडाल्याचं दिसतंय. शिवसेना आणि भाजप नेते एकमेकांवर खुलेआम आगपाखड करत आहेत. मात्र गेल्या काही दिवसांपासून एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्रिपदावर विराजमान करण्याच्या शिवसेना नेत्यांच्या मागणीनं या वादात पुन्हा उचल खाल्ल्याचं दिसतंय. शिवसेना नेते अब्दुल सत्तार आणि रवींद्र धंगेकर यांनी थेट मुख्यमंत्रिपदावर वक्तव्य केलं आहे. तसेच महायुती टिकवायची की नाही हे आता भाजपच्या हातात असल्याचं अब्दुल सत्तार म्हणाले.

२०२४ च्या विधानसभा निवडणुका महायुती एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वात लढल्यानं मुख्यमंत्रिपदावर शिंदेंचाच अधिकार असल्याचं अब्दुल सत्तारांनी म्हटलं आहे. तर शिंदेंच्या काळात सरकार आणि जनतेतला समन्वय चांगला होता. त्यामुळे शिंदेंच पुन्हा मुख्यमंत्रिपदावर विराजमान व्हावेत, असं धंगेकरांनी म्हटलं आहे. त्यामुळे निवडणूक निकालानंतर निर्माण झालेल्या वादाचा मुख्य उद्देश हा मुख्यमंत्रिपदाबाबत असल्याचं लपून राहिलेलं नाही. छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी राष्ट्रवादीच्या सतीश चव्हाण यांना आम्ही पाठिंबा देणार नाही असं जाहीर केलं. आमच्या नेत्यांनी तसं जाहीर केल्यानंतर आम्हीदेखील सतीश चव्हाण यांना विरोध केला. मी लपून–छपून काही केलं नाही, जे काही केलं ते खुलं केलं.

महायुतीमध्ये कोणताही मिठाचा खडा पडला नाही. तसं काही असेल तर मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री हे एकत्र बसतील आणि चर्चा करून मार्ग काढतील. त्यांनी आम्हाला काही प्रश्न विचारले तर आम्ही त्याचे उत्तर देऊ. आजकाल देशामध्ये जी परिस्थिती निर्माण झाली आहे त्यामध्ये अब्दुल सत्तार नावाला विरोध केला जात आहे. त्यामुळे आमच्यासारख्या कार्यकर्त्याला अनेक संकटातून वाट निर्माण करावी लागते, असंही अब्दुल सत्तार म्हणाले.

शिवसेनेनं केसानं गळा कापला -भाजपची प्रतिक्रिया

नुकत्याच पार पडलेल्या विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुकांचे निकाल समोर आले असून, यामध्ये महाविकास आघाडी आणि महायुती यांच्यात जोरदार रस्सीखेच पाहायला मिळाली. यामध्ये महाविकास आघाडीने पदवीधरच्या ३ पैकी ३ जागा जिंकल्या, सत्ताधारी महायुतीने शिक्षकांच्या दोन्ही जागा जिंकल्या, तर पाचपैकी फक्त दोन जागा मिळाल्याने महायुतीतील नेत्यांनी याबाबत नाराजी व्यक्त केली आहे, त्याचबरोबर मित्रपक्षाची साथ सुटल्यामुळे महायुतीला फटका बसल्याचा ठपका भाजपने शिवसेनेवर ठेवला आहे. शिवसेनेच्या भूमिकेने महायुतीच्या गणिताला सुरुंग लावल्याचा भाजपचा मित्रपक्षावर आरोप आहे. भाजप प्रवक्त नवनाथ बन यांनी पुण्यातील आणि संभाजीनगरमधील पदवीधरच्या जागेवरती शिवसेना पक्षाने घेतलेल्या भुमिकेवर निशाणा साधत हल्लाबोल केला आहे. आधी सोशल मिडीयावरती पोस्ट केली, त्यानंतर आता पत्रकार परिषद घेत शिवसेनेनं धंगेकरांवर कारवाई केली पाहिजे अशी मागणी देखील नवनाथ बन यांनी केली आहे. केसांनी गळा कापण्याचा निर्णय घेतला असेल तर रवींद्र धंगेकरांवर कारवाई केली पाहिजे.

देशात प्रथमच बॅटरीद्वारे १००० मेगावॅट वीजपुरवठा; महावितरणचे यश

मुंबई (प्रतिनिधी)– मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या कृषी पंपांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठीच्या सौरऊर्जानिर्मिती योजनेत निर्माण झालेली अतिरिक्त वीज तसेच ग्रीडद्वारे उपलब्ध स्वस्त सौरऊर्जा बॅटरीमध्ये साठवून सायंकाळी मोठ्या वीज मागणीच्या वेळी वापरण्यासाठी महावितरणने १००० मेगावॅट अवरचा टप्पा गाठला आहे. देशात प्रथमच विकेंद्रित स्वरुपात बॅटरीचा वापर करून इतका मोठ्या प्रमाणात वीज पुरवठा करण्यात येत असून राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे वाढलेल्या वीजमागणीच्या काळात हा वीजपुरवठा अत्यंत उपयुक्त ठरला आहे, अशी माहिती मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली.

त्यांनी सांगितले की, मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने राज्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ही गेमचेंजर योजना राबविण्यात येत आहे. या योजनेत आतापर्यंत सुमारे ७ हजार मेगावॅट क्षमतेचे विकेंद्रित सौरऊर्जानिर्मिती प्रकल्प सुरू झाले आहेत. या प्रकल्पांमधून निर्माण होणारी वीज कृषीपंपांना देण्यात येते. अतिरिक्त वीज बॅटरीमध्ये साठवून सायंकाळी कमाल वीज मागणीच्या वेळी देण्यासाठी महावितरणने सुरु केलेल्या बॅटरी एनर्जी स्टोरेज सिस्टिम (बीईएसएस) योजनेत ५०० मेगावॅट क्षमतेची बॅटरी साठवणूक क्षमता नुकतीच कार्यान्वित करण्यात आली आहे. त्यातून दोन तास वीजपुरवठा होणार असल्याने १००० मेगावॅट अवर इतकी बीईएसएस क्षमता उपलब्ध झाली आहे. मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार सुरू झालेल्या बॅटरी स्टोरेज योजनेतून सर्वच वीजग्राहकांना लाभ होत आहे.

एल निनोच्या प्रभावामुळे पाऊस कमी झाला असून त्यामुळे ऑक्टोबर महिन्यात उष्णतेच्या झळा अधिक जाणवत आहेत. परिणामी विजेची उच्चांकी मागणी होत आहे. सौरऊर्जेमुळे दिवसा पुरेसा व किफायतशीर दरात वीजपुरवठा होत आहे. सायंकाळी सौरऊर्जेचा पुरवठा बंद झाल्यानंतर वीज पुरवठा करण्यासाठी अधिक दराने वीज विकत घ्यावी लागते. अशा स्थितीत महावितरणच्या पुढाकाराने सुरू झालेल्या १००० मेगावॅट अवर क्षमतेच्या बॅटरी स्टोरेज प्रकल्पामुळे दिलासा मिळू लागला आहे.

महावितरणने एकूण ७५० मेगावॅट क्षमतेचे बॅटरी साठवणूक प्रकल्प उभारण्याची योजना सुरू केली असून त्यातून दोन तासांसाठी प्रत्येकी ७५० मेगावॅट अर्थात एकूण १५०० मेगावॅट अवर वीज उपलब्ध होईल. त्यापैकी १००० मेगावॅट अवरचे काम पूर्ण झाले आहे. ऊर्वरित काम डिसेंबरअखेर पूर्ण होणे अपेक्षित आहे. याखेरीज ४००० मेगावॅट अवर क्षमतेचे प्रकल्प उभारणीचे काम प्रगतीपथावर आहे. या प्रकल्पामुळे सायंकाळी उच्चांकी मागणीच्या वेळी हमखास वीज उपलब्ध होणे आणि बाजारभावाच्या तुलनेत अत्यंत किफायतशीर दरात उपलब्धता असे दोन लाभ आहेत. आगामी उन्हाळ्यात या योजनेचा सर्वाधिक लाभ होईल.

नागपूर पदवीधर निवडणूक: भाजपच्या मतदारांमुळेच भाजपला फटका

नागपूर (प्रतिनिधी)– नागपूर पदवीधर निवडणुकीत तब्बल १५ हजार ३२ मते अवैध ठरली आहेत. भाजपला उमेदवाराला मतदान केलेल्या काही मतदारांनी मतपत्रिका कोरी सोडली, तर काहींनी पसंतीक्रमाऐवजी 'राईट'ची खूण केली. काहींनी क्रमांक लिहून त्याभोवती गोल केला, तर काहींनी उमेदवाराच्या छायाचित्राजवळ पसंतीक्रम नोंदविला. याचाच फटका भाजप उमेदवार सुधाकर कोहळे यांना बसला आहे.

विधान परिषदेच्या नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत ३८ उमेदवार रिंगणात होते. या निवडणुकीसाठी एकूण दोन लाख ५५ हजार ६०३ मतदारांची नोंदणी झाली होती. त्यापैकी एक लाख ६५ हजार ६७२ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. या निवडणुकीत पहिल्या पसंतीक्रमांकाची सर्वाधिक मते भाजपचे सुधाकर कोहळे यांना मिळाली. तर काँग्रेसचे अभिजीत वंजारी यांना ५६६३० मत मिळाली होती. तर नितेश कराळे यांना २४,२४९ मते मिळाली. तर १५ हजार ३२ मते अवैध ठरली. विजयासाठी ७५,४३८ मतांचा कोटा निश्चित करण्यात आला. कोहळे यांना पहिल्या पसंतीक्रमाच्या फेरीत ४२९४ मतांची आघाडी होती. परंतु कोटा पूर्ण करता आला नसल्याने दुसऱ्या पसंतीच्या मतांची मोजणी करण्यात येत आहे.

पाणीटंचाई रोखण्यासाठी आतापासूनच नियोजन करा; उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे आदेश

पुणे (प्रतिनिधी)– पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी प्रशासनाने आतापासूनच योग्य त्या उपाययोजना कराव्यात, अशा स्पष्ट सूचना उपमुख्यमंत्री आणि पुण्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिल्या आहेत.

विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे येथे आयोजित कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत त्या बोलत होत्या. या बैठकीत दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पुणे जिल्ह्यातील पाणी उपलब्धता, संभाव्य पाणीटंचाई आणि आगामी काळातील पाणी नियोजनाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. नागरिकांना पिण्यासाठी पुरेसे पाणी उपलब्ध करून देण्यास सर्वोच्च प्राधान्य दिले जावे. तसेच शेती आणि पशुधनासाठी आवश्यक पाण्याचे योग्य नियोजन करून उपलब्ध जलसाठ्याचा काटकसरीने वापर करावा, असे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

पुणेशहराच्यापाणीपुरवठ्याबाबत चर्चा करताना, पुणे महानगरपालिकेने उपलब्ध पाण्याचा काटेकोर वापर करून प्रभावी नियोजन करावे, असे सांगण्यात आले. तसेच पुणे महानगरपालिकेला १३ टीएमसी पाणी उपलब्ध करून देण्याबाबत नियोजन करण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले. यावेळी उपस्थित नेत्यांनी आणि अधिकाऱ्यांनी लोकनेते स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या दुष्काळाच्या काळातील पाणी नियोजनाच्या कार्याची आवर्जून आठवण केली.

कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रॅडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



//प्रतिवादीस जाहीर नोटिस//

सह दिवाणी न्यायाधिश ,क. स्तर, लोहा, ता. लोहा, जि. नांदेड यांचे न्यायालयात

आर.सी.एस.क्र. ६८/२०२३ नि.क्र. ५२

मोहम्मद मुन्वरअली पि. सरदारअली व इतर
विरूध्द
साबेरा बेगम अब्दुल रशिद व इतर

प्रति, (प्रतिवादी)

६) तस्लीम बेगम भ्र. जहांगीरखॉन, वय : ५० वर्षे, धंदा : घरकाम,
रा. दुलेशाहनगर खडकपुरा नांदेड ता.जि. नांदेड
मो. नं.९१७५५४४२०७

ज्याअर्थि आपणास या नोटिसव्दारे कळविण्यात येते की, या न्यायालयातील नियमित दिवाणी दाव्यामध्ये तुम्हास प्रतिवादी क्र. ६ म्हणुन समाविष्ठ करणे साठी वादीने अर्ज दाखल केला आहे त्या अर्जावर तुम्ही म्हणणे दाखल करावे असा आदेश केला आहे.

तरी आपण स्वत: किंवा वकिलासह या न्यायालयात **दिनांक ०७/११/२०२६** रोजी न चुकता हजर रहावे आणि आपले म्हणणे दाखल करावे. अन्यथा दाव्यामध्ये नियमानुसार पुढिल आदेश करण्यात येईल किंवा निकाली काढण्यात येईल याची जबाबदारी आपणावर राहिल. याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १९/१०/२०२६ रोजी माझे सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

आदेशावरून,
सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय,क.स्तर, लोहा
ता. लोहा जि. नांदेड.

टी.सी. व इतर कागदपत्रे हरवले

माझी गंगासागर परसराम ढवळे रा. पाटोदा ता.नायगाव जि.नांदेड या नावाची १२ वी पासची टी.सी. व ईतर कागदपत्रे कहाळा ते नांदेड बस प्रवासात हरवली आहे. कुणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क करावा.

संपर्क पत्ता –
गंगासागर परसराम ढवळे रा. पाटोदा, पोस्ट बरबडा ता.नायगाव खै जि. नांदेड मो. ९८२३०७२११६

Change In Name

MY Old name is **SALEHA YASMEEN MUKHEED SHAIKH** which naw I am changing as new name **SALEHA YASMEEN MUKHTAR SHAIKH** hence forth my all correspondency will be done as per my new name please consider the same

SING BY : SALEHA YASMEEN MUKHTAR SHAIKH KUNDALWADI BILOLI NANDED 431711 Mob.8788190035

Change In Name

My old name **SUMAIYYA BEGUM SHAIKH MAHBOOB**
Address new Abadi mudkhed
Dist nanded
New name **SHAIKH SUMAYA SHAIKH DAUD**
Address H No 1090 Near JAMA Masjid
Navi Abadi Barad PO barad dist nanded
Maharashtra 431745

Change In Name

My old Name is **PRAFULLA HIRACHAND YEWANKAR** which now I am changing as new Name **PRAFUL HIRACHANDYEWANKAR.**Henceforth, My all correspondence will be done As per my new Name. Please consider the same.

ADDRESS - R/O H NO 1-2-132 SHIVAJI NAGAR NANDED-431602

!! जाहीर प्रगटन !!

मा.तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, लोहा यांचे न्यायालयात

प्रकरण:- जन्म/मृत्यु नोंद घेणे बाबत.

अ.क्र.	
अर्ज दिनांक	03.08.2026
अर्जदार यांचे नाव	हिवंत राम गुलाब रा.खरबी ता.लोहा
अर्जदार यांचेशी असलेले नाते व नाव	स्वतः हिवंत.राम गुलाब रा.खरबी ता.लोहा
अर्जदारांचे विरुध्द ग्रामपंचायत कार्यालय, खरबी	ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, खरबी ता. लोहा
जन्मदिनांक	01.07.1997
मृत्यु दिनांक	———
जन्म/मृत्युस्थळ	लोहा
जन्म/मृत्यूनोंदणी प्राधिकारी	ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, खरबी ता. लोहा

ज्याअर्थीउपरोक्त वर नमूद अर्जदार यांनी न्यायालयात हजर राहून जन्म / मृत्यूनोंदणी कायदा 2023 शासन निर्णय 12 मार्च 2025 अन्वये अर्ज दाखल केला आहे.

अर्जदार/ अर्जदार यांचे नातेवाइक यांच्या जन्माची / मृत्यूची नोंद घेण्यासाठी ग्राम पंचायत कार्यालय येथे नोंद उपलब्ध नाही.त्याअर्थी या जाहिरप्रगटनाव्दारे सर्व ~~जनतेस व संबंधितास कळविण्यात येते कि, वरील~~ अर्जदार यांचे नातेवाईक यांच्या जन्माची / मृत्यूची नोंद वर नमूद ठिकाणी घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास, त्यांनीजाहीर प्रगटन प्रसिध्द झाले पासून पंधरा दिवसात या न्यायालयात स्वतः किंवा वकिलामार्फत हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. विहित कालावधीत हजर राहून आक्षेप किंवा उजर न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारित करण्यात येईल.

आज दिनांक :03/09/2026 रोजी माझ्या सहीनिशी व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात येत आहे.

तहसिलदार लोहा

जाहिरप्रगटन

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर , ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात,

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२३०/ २०२६

पुढील तारीख – १६.११.२०२६

अर्जदार : १) संभाजी पि. माधवराव बोडके, वय ३७ वर्षे, धंदा शेती, रा. आरळी, ता. बिलोली, जि. नांदेड
२) देविदास माधवराव बोडके, वय ३४ वर्षे, धंदा शेती, रा. आरळी, ता. बिलोली, जि. नांदेड
३) संगिता भ्र. बस्वराज भुरे, वय ३० वर्षे, धंदा घरकाम, रा. खानापूर, ता. देगलुर, जि. नांदेड
४) राजाबाई भ्र. मारोती जामनोर, वय ४५ वर्षे, धंदा घरकाम, रा. कार्ला बु., ता. बिलोली, जि. नांदेड

विरुध्द.

गैरअर्जदार: निरंक

विषय– वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत..

ज्याअर्थी अर्जदार हयांनी मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार क्रमांक ०१ ते ०४ हे **मयत माधवराव पि. संभाजी बोडके** यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराने कथन केले आहे की, अर्जदार क्रमांक ०१ ते ०४ हे **मयत माधवराव पि. संभाजी बोडके** यांचे अपत्ये आहेत. **मयत माधवराव पि. संभाजी बोडके** यांचा मृत्यु दिनांक **०५/०१/२०२६** रोजी झाला. **मयत माधवराव पि. संभाजी बोडके** यांची पत्नी लक्ष्मीबाई माधवराव बोडके यांचा मृत्यु दिनांक २६/०९/२००७ रोजी झाला आहे. अर्जदाराने अर्जामध्ये असे कथन केले की, अर्जदार क्रमांक ०१ ते ०४ हयांना **मयत माधवराव पि. संभाजी बोडके** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदार यांनी मा. न्यायालयात **मयत माधवराव पि. संभाजी बोडके** यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील अर्जदार हे **मयत माधवराव पि. संभाजी बोडके** यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल,अगर **मयत माधवराव पि. संभाजी बोडके** यांचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिरप्रगटन/नोटीस प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे **मयत माधवराव पि. संभाजी बोडके** यांचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू **मयत माधवराव पि. संभाजी बोडके** यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १४/१०/२०२६ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून,
क. लिपीक — सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर., बिलोली — दिवाणी न्यायालय व. स्तर., बिलोली

जाहिरप्रगटन

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर , ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात,

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२३७/ २०२६

अर्जदार : ०१. बालाजी पि. माधवराव कदम , वय – ४२ वर्षे, धंदा – शेती,
रा. दुगांव ता.बिलोली जि. नांदेड
०२. लक्ष्मीबाई भ्र. माधवराव कदम , वय – ६५ वर्षे, धंदा – घरकाम ,
रा. दुगांव ता.बिलोली जि. नांदेड
०३. सौ.महानंदा भ्र. बालासाहेब शिंदे , वय – ३७ वर्षे, धंदा – घरकाम ,
रा. चिंचाळा ता.उमरी जि. नांदेड
०४. सौ.विजया भ्र. कल्याणे संदिप पाटील , वय – ३५ वर्षे, धंदा – घरकाम ,
रा. १–२–५ गणेशनगर भैसा आदिलाबाद आंध्रप्रदेश ५०४१०३.

पुढील तारीख – २०.११.२०२६

विरुध्द.

गैरअर्जदार: **निरंक .**

विषय– वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत..

ज्याअर्थी अर्जदार हयांनी मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, **मयत** यांचे कायदेशीर वारस आहेत. **मयत माधवराव पि.गोविंदराव कदम यांचे अर्जदार क्र १ ते ४ हे त्यांचे अपत्ये आहेत. मयत माधवराव पि.गोविंदराव कदम** त्यांच्या मृत्यू दिनांक ३१/०७/२०२६ **रोजी सह्योग मल्टी स्पेशालिस्ट हॉस्पीटल नांदेड येथे झाला.** अर्जदार हयांना **मयत माधवराव पि.गोविंदराव कदम** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदार यांनी मा न्यायालयात **सदर मयत माधवराव पि.गोविंदराव कदम** यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला **आहे तरी** वरील अर्जदार हे **सदर मयत माधवराव पि.गोविंदराव कदम** यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर **सदर मयत माधवराव पि.गोविंदराव कदम** यांचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिरप्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे **सदर मयत माधवराव पि.गोविंदराव कदम** यांचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू **सदर माधवराव पि.गोविंदराव कदम** यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २३/ १० /२०२६ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून,
क. लिपीक, दिवाणी न्यायालय व. स्तर., बिलोली — सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय व. स्तर., बिलोली

टी.सी. हरवली

माझी **रेखा कोंडीबा बनसोडे** या नावाची पाचवी पासची टी.सी. नांदेड ते मुंबई प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

संपर्क मोबाईल
रेखा कोंडीबा बनसोडे
रा. मील रोड, नांदेड

वर्तमानपत्रात प्रसिध्दीकरणासाठी

Notice of Inquiry
(Form No.२)

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालय, नांदेड विभाग, नांदेड.
सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ चौ.क्र ४७५/ २०२६

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था, **गुलाबी सेवाभावी प्रतिष्ठान नांदेड ता.जि.नांदेड ,नोंदणी क्रमांक एफ-११७२४(नांदेड), यांस आबेदाबी लालामिया शेख** कलम२२ अन्वये भरलेला नमुना यांच्य संबंधात,

१. आरीफा परविन अहमेद हुसेन रा आय.टी.आय जवळ विसावा नगर नांदेड
२. फरजाना पाशासाब शेख रा आय.टी.आय जवळ विसावा नगर नांदेड
३. शेख शादुला शेख लालामिया रा आय.टी.आय जवळ विसावा नगर नांदेड
४. शेख फरीद लालामिया रा आय.टी.आय जवळ विसावा नगर नांदेड
५. फरजाना अहेमदसाब शेख रा आय.टी.आय जवळ विसावा नगर नांदेड
६. रजीयाबी शादुला शेख रा आय.टी.आय जवळ विसावा नगर नांदेड

यांस ज्या अर्थी, सही करणार याकडुन वरील सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थे संबंधात कलम २२ अन्वये दाखल करण्यासाठी चौकशी करण्यात येणार आहे.

सदर चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा द्यावयाचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासुन तीस दिवसांचे आत कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफयतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजुन चौकशी पुर्ण केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहायक धर्मादाय आयुक्त, नांदेड यांचे शिक्यानिशी आज दिनांक २६/१०/२०२६ रोजी दिली.

अधिक्षक (न्याय)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नांदेड विभाग नांदेड

जाहिर प्रगटन

माझे पक्षकार, श्री बाबु दिनानाथ निलेवाड उर्फ विश्वनाथ (पांगरेकर) रा. मारोती मंदिरामागे देगलुर रोड, बळीरामपुर, ता. जि. नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकाराने हे जाहिर प्रगटन देण्यात येते की, हे की, माझे पक्षकार वरीलप्रमाणे राहणार असुन माझे पक्षकाराची सुटयाचीवाडी ता. कंधार येथे जमिन व नांदेड प्लॉट्स आहेत. माझे पक्षकारांचे वडील दिनानाथ लक्ष्मण निलेवाड (पांगरेकर) व ईतरांमध्ये मालमत्तेवरून वाद निर्मान होवून सदरच्या वादाबाबत प्रकरण न्यायप्रविष्ट झाले त्यात माझे पक्षकारांचे वडील दिनानाथ व त्यांचे भावात तडजोड झाली. त्यात आनंद नगर गृहनिर्माण संस्था नांदेड येथिल प्लॉट नं. 72 क्षेत्र 308.00 चौ. मी. हा माझे पक्षकारांच्या हिश्यात देण्यात आला. परंतु माझे पक्षकारांचे वडील व भाऊ यांच्या कौटुंबिक व्यवस्थेत सदरचा प्लॉट व्यंकट विठ्ठलराव पांगरेकर यांच्या नावे पि आर (मालमत्त पमडात) नोंद आहे. त्यामुळे सदरचा प्लॉट त्यांच्या नावे नोंद असल्याचा गैरफायदा घेवुन व्यंकट विठ्ठलराव पांगरेकर हे सदरचा प्लॉट गिळंकृत करण्याच्या वाईट उद्देशाने प्रेरीत होवुन दुस-यास विक्री करण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे सदरचा प्लॉट कुणीही सदर व्यंकट विठ्ठलराव पांगरेकर यांच्याकडुन खरेदी विक्री व्यवहार करू नये, केल्यास सदरचा व्यवहार माझे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही व करणा-यास दिवाणी व फौजदारी कार्यवाहीस सामोरे जावे लागेल त्यास तेच स्वत: जवाबदार असतील कृपया याची नोंद घ्यावी.

मार्फत — **प्रगटन देणार**
ॲड. एस. एस. देशमुख. — **बाबु उर्फ विश्वनाथ दिनानाथ निलेवाड (पांगरेकर)**

रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

सेवा क्लिनीक

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308

फायनान्स कंपन्यांची मुजोरी मोडून काढा; हेक्टरी १ लाख रुपये मदत देत सरसकट कर्जमाफी करा

◆ नांदेडमध्ये रविकांत तुपकर यांची मागणी

नांदेड (प्रतिनिधी)– नांदेड येथे मायक्रो फायनान्स कंपनीच्या कार्यालयात शेतकऱ्याचा संशयास्पद मृतदेह आढळल्याच्या घटनेवरून गुरुवारी नांदेड येथे शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी पत्रकार परिषद घेऊन सरकार आणि फायनान्स कंपन्यांवर हल्लाबोल केला.

माळकौठा (ता. मुदखेड) येथील शेतकरी चंद्रकांत शिंदे यांचे १० हजार रुपयांचे कर्ज होते. कंपनीने ७० हजारांची मागणी करत त्यांचे अपहरण करून हत्या केली आणि आत्महत्येचा बनाव रचला, असा आरोप तुपकर यांनी केला. पूर्वी मुंबईत दाऊदची दहशत होती. तशीच दहशत आज गावागावात फायनान्सवाल्यांची आहे. शेतकरी आणि बचत गटातील महिलांना गुंड पाठवून धमकावले जाते, असे तुपकर म्हणाले.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर सर्व फायनान्स कंपन्यांची कर्जवसुली तात्काळ थांबवा, मृत शेतकऱ्याच्या कुटुंबाला न्याय द्या, कंपनीच्या मालक–संचालकावर खुनाचा गुन्हा दाखल करा, शेतकऱ्यांना हेक्टरी १ लाख रुपये मदत देत सरसकट कर्जमाफी करा, चारा छावणी नको, तर थेट दावणीला चारा द्या आदी मागण्या करण्यात आल्या.

कुंभमेळा पुढे ढकला

राज्यात शेतकरी दुष्काळाने होरपळत असताना कुंभमेळ्यासाठी ३५ ते ३८ हजार कोटींचा खर्च करण्यापेक्षा तो पैसा शेतकऱ्यांना द्या, अशी मागणीही त्यांनी केली. हिवाळी अधिवेशन नागपुरात न घेता दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधावर घ्या, असेही ते म्हणाले.

फायनान्स कंपन्यांवर निर्बंध घातले नाहीत, तर महाराष्ट्रात एकही फायनान्स कंपनीचे कार्यालय शिल्लक ठेवणार नाही. SIT चौकशी निष्पक्ष नाही, असा इशारा तुपकरांनी आजच्या पत्रकार परिषदेत दिला. या पत्रकार परिषदेला क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

न्यायालयाची अंतिम नोटीस: फरार आरोपीला ३० ऑक्टोबरला हजर राहण्याचे आदेश, अन्यथा गैरहजेरीतच चालणार खटला

नांदेड (प्रतिनिधी)– न्यायालयाने कलम ३५६, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता अन्वये सजाद हुसेन जाफर हुसेन (वय ५६) रा. सिटीझन हॉटेलच्या मागे, रेल्वे स्टेशन रोड, नांदेड हा गुन्हा क्र. ९८८/२००३ मध्ये फरार असून, त्याच्या विरुद्ध न्यायालयाकडून जाहीरनामा काढण्यात आला आहे.

त्याच्या विरुद्ध भारतीय नागरिक सुरक्षा संहिताच्या कलम ३५६ अन्वये गैरहजेरीत खटला पुढे सुरू ठेवण्याबाबत न्यायालयाने आदेश पारित केला आहे. या नोटीसीद्वारे अंतिम व शेवटची संधी म्हणून सुचित करण्यात येते की, दि. ३० आक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता संबंधित न्यायालयात स्वतः हजर रहावे.

जर सदर तारखेला हजर राहिला नाहीत, तर आपल्या गैरहजेरीतच सदर प्रकरण पुराव्यासाठी व पुढील सुनावणीसाठी ठेवण्यात येईल, याची गंभीरपणे नोंद घ्यावी, असे मुख्य न्याय दंडाधिकारी यांच्या न्यायालयाने कळविले आहे.

आसना पुलावर कंटेनर-ट्रेलरच्या धडकेत १ ठार; पोलीस कर्मचारी गंभीर जखमी

◆ १६ तासांच्या अथक प्रयत्नांनंतर गॅस कटरच्या साह्याने मृतदेह बाहेर काढण्यात यश

◆ फायर ब्रिगेड, जीव रक्षक दल, महामार्ग व विमानतळ पोलिसांचे शर्थीचे प्रयत्न

अर्धापूर (प्रतिनिधी)– नांदेड -नागपूर रोडवरील आसना पुलावर बुधवार, दि. २८ ऑक्टोबर रोजी रात्री ९ वाजता अपघात झाला होता. अपघातग्रस्त वाहनांची वाहतूक सुरळीत करण्याचे काम सुरू असताना पाठीमागून भरधाव वेगात आलेल्या लोखंडी गजाळ्या वाहतूक करणाऱ्या भरधाव ट्रेलरने धडक दिल्याने झालेल्या दुर्घटनेत ट्रेलर चालक जागीच ठार झाला तर एक पोलीस कर्मचारी गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. तब्बल १६ तासांच्या शर्थीच्या प्रयत्नांनंतर चालकाचा अडकलेला मृतदेह बाहेर काढण्यात आला. कमलसिंग तोमर (वय ५४) रा. गोपालपूर औरैया उत्तर प्रदेश असे मृत ट्रेलर चालकाचे नाव आहे तर पोलीस कर्मचारी व्यंकटेश अलेवार हे गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आसना पुलावर एका कार आणि कंटेनरचा अपघात झाला. या अपघाताची माहिती मिळताच मृत्युंजय दूत गोविंद टेकाळे यांनी तत्काळ महामार्ग पोलिसांना माहिती दिली आणि ११२ वरून विमानतळ पोलिसांना या अपघाताची माहिती मिळाली असता महामार्ग पोलीस व विमानतळ पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळी वाहतूक सुरळीत करण्याचे काम सुरू केले असतानाच पाठीमागून भरधाव वेगाने आलेल्या एका

लोखंडी गजांच्या ट्रेलरने अपघातग्रस्त कंटेनरला जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत ट्रेलर चालक कमलसिंग तोमर जागीच मृत पावला. तसेच या कारवाईत कर्तव्य बजावत असलेले पोलीस कर्मचारी व्यंकटेश अलेवार हे गंभीर जखमी झाले. त्यांना तत्काळ उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

कंटेनरचा चालक केबिनमध्ये अडकला असल्याने त्याला बाहेर काढणे अत्यंत आव्हानात्मक ठरले. अग्निशामक दल, जीव रक्षक दल आणि पोलीस प्रशासनाने रात्रभर अथक प्रयत्न केले. अखेर गुरुवारी गॅस कटर आणि इतर आधुनिक साधनांच्या साह्याने तब्बल १६ तासांनंतर चालकाचा मृतदेह गाडीतून बाहेर काढण्यात आला.

गोविंद कोकुलवार गोळीबार प्रकरणातील सर्व आरोपी अखेर सात वर्षानंतर निर्दोष

जिल्हा सत्र न्यायालयाचा निकाल

नांदेड (प्रतिनिधी) –शहरातील चौफाळा विणकर कॉलनी परिसरात राहणाऱ्या गोविंद गोकुलवार यांच्यावर दुचाकीवरून आलेल्या दोघांनी गोळीबार केला होता. यात गोविंद कोकुलवार गंभीर जखमी झाले होते. प्रकरणात आरोपींना निष्पन्न करून अटक केले होते. त्यांच्यावर संघटित गुन्हेगारी अंतर्गत गुन्हाही दाखल करण्यात आला, मात्र सबळ पुराव्याअभावी यातील फरार हरविंदरसिंग रिंदा, पोलीस निरीक्षक विनोद दिघोरे आणि इतर सहा जणांना येथील जिल्हा न्यायाधीश संतोष नागरगोजे यांनी गुरुवार दिनांक २९ ऑक्टोबर रोजी निर्दोष मुक्त केले.

शहरातील विणकर कॉलनी परिसरात एका व्यापाऱ्यावर अज्ञात व्यक्तीने पाठीमागून बंदुकीने गोळी झाडल्याची खळबळजनक घटना दि. १७ ऑगस्ट २०१९ रोजी दुपारी घडली होती. या घटनेत व्यापारी अजूनही व्हील चेअरचा आधार घेत आहे.

जखमी गोविंद मुळशीराम कोकुलवार (वय ४६ वर्षे, व्यवसाय - व्यापार, रा. न्यायनगर, कोकुलवार हॉस्पिटल जवळ, नांदेड) यांच्यावर गोळीबार झाल्यानंतर त्यांना तातडीने शहरातील व्हीआयपी रोडवर असलेल्या ग्लोबल हॉस्पिटलमध्ये दाखल केले होते. त्यानंतर राज्याचे माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनीही रुग्णालयात जाऊन त्यांची भेट घेतली आणि त्यानंतर लगेच एअर ॲम्बुलन्सने त्यांना उपचारासाठी मुंबईला पाठवले होते. गोविंद गोकुलवार यांचा मुलगा नागेश हा श्री ओम पतपेढी, विणकर कॉलनी येथे काम पाहत होता.

दि. १७ ऑगस्ट २०१९ रोजी ते न्यायनगर येथील घरातून चारचाकी वाहन क्र. MH-26-BC-7212 ने जुन्या मोंढा येथील राजा रणजीतसिंग मार्केटवरील चालू असलेल्या बांधकामाची पाहणी करून, दुपारी अंदाजे ४.३० वाजेच्या दरम्यान विणकर कॉलनी येथील कार्यालयाजवळ पोहोचून गाडी लावली. गाडीतून उतरून कार्यालयाकडे जात असताना अचानक त्यांच्या पाठीत शॉक लागल्यासारखे झाले आणि ते खाली कोसळले.

यावेळी कार्यालयातील साहेबराव कदम आणि गोविंद गुडेवार यांनी डॉ. भोपळे यांना बोलावून घेतले. डॉ. भोपळे यांनी तपासून साहेबराव कदम व गोविंद गुडेवार यांच्या मदतीने मला तात्काळ ग्लोबल हॉस्पिटल येथे आणले. नंतर उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी सांगितले की, त्यांना पाठीमागून बंदुकीची गोळी लागली आहे.

त्यानंतर त्यांच्या फिर्यादीवरून इतवारा पोलीस ठाण्यात अनोळखी मारेकऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. तत्कालीन उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील आणि पोलीस निरीक्षक प्रदीप काकडे यांनी तपास सुरू केला. तपासात फरार असलेला हरविंदर सिंग उर्फ रिंदा चरणसिंग संधू, गुरुचरण सिंग उर्फ लकी संपूर्णसिंग गिल, सय्यद नझरुद्दीन उर्फ गुड्डू सय्यद मुनिरोदिन, बजरंग उर्फ योद्धा भीमराव नरवाडे, राजू देवराव राऊत, सुभाष मोहन पवार, वीरेंद्र उर्फ सतीश सोपान कानोजी आणि विनोद दयाळू दिघोरे यांच्याविरुद्ध प्राणघातक हल्ला, भारतीय हत्यार कायदा या सोबतच संघटित गुन्हेगारी अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी तपासांती न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले. न्यायालयाने या प्रकरणात ५७ साक्षीदारांची तपासणी केली. सरकार पक्षाच्यावतीने ॲड. यादव तळेगावकर यांनी तर आरोपींच्या बाजूने ॲड. मिलिंद एकताटे, राजू कुलकर्णी, ॲड. अरिफोद्दिन यांनी युक्तिवाद केला. सबळ पुराव्या अभावी वरील सर्व आरोपींना न्यायालयाने निर्दोष मुक्त केले आहे.

महाविकास आघाडीच्या विजयानंतर सिडकोत काँग्रेसकडून जल्लोष

नवीन नांदेड (प्रतिनिधी) – राज्यातील पदवीधर विधान परिषद निवडणुकीत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष महाविकास आघाडीने तीनपैकी तीनही जागेवर विजय मिळविल्याबदल सिडको काँग्रेसच्या वतीने महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतिषबाजी करत ढोल ताशा वाजवीत परिसरातील सर्वच महापुरुषांच्या पुतळ्यांना अभिवादन करत गुरुवार दि. २९ रोजी जल्लोष साजरा केला.

राज्यातील पदवीधर व शिक्षक विधान परिषद निवडणुकीत पाच पैकी तीन जागा महाविकास आघाडीने जिंकल्या आहेत. यात पदवीधर विधान परिषदेच्या तीनपैकी तीन जागेवर महाविकास आघाडी विजयी झाली आहे. नागपूर विभागातून काँग्रेसचे अभिजित वंजारी, छत्रपती संभाजीनगर

विभागातून डॉ. प्रतापसिंह पाटील व पुणे विभागातून हर्षदा जाधव देशमुख या विजयी झाल्या आहेत. दरम्यान या विजयानंतर सिडको काँग्रेसच्या वतीने फटाक्यांची आतिषबाजी करत ढोल ताशा वाजवीत परिसरातील सर्वच महापुरुषांच्या पुतळ्यांना अभिवादन करत जल्लोष साजरा करण्यात आला.

यावेळी सिडको ब्लॉक काँग्रेस कमिटी अध्यक्ष बापूसाहेब पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे गजानन चव्हाण, सिडको महिला अध्यक्ष ज्योतीताई कदम, ओबीसी महानगर अध्यक्ष विनोद कांचनगिरे, वजीराबाद ब्लॉक कमिटी अध्यक्ष दीपकसिंग हुजूरिया, डॉ. अशोक कलंत्री, प्रल्हाद गव्हाणे, गणेश लिंगमपल्ले, एस पी कुंभारे, गोपीनाथ कहाळेकर, माणिक श्रोते, नुरुद्दीन शेख, सोपान भुरे, सोपान पांडे, रामकिशन इंदूरकर, उत्तमराव कदम, गजानन शिंदे, शेख याखूब, अजय गालेवाड, अजहर शेख, नईम शेख, सचिन कानडे, अँड. सचिन वरपडे, जाफर शेख, सिराज खान, प्रभू उरुदवाड, आदीसह काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

मतदार यादीतील अनियमिततेच्या निषेधार्थ किनवटमध्ये काँग्रेसचे आंदोलन

किनवट (प्रतिनिधी)– मतदार यादीतील संभाव्य अनियमिततेची निष्पक्ष चौकशी करावी, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा आणि नांदेड जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये आर्थिक मदत द्यावी, आदी मागण्यांसाठी किनवट तालुका व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने गुरुवारी सहायक जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात लोकशाही व्यवस्थेत निवडणूक प्रक्रिया निष्पक्ष, पारदर्शक आणि विश्वासार्ह असणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. विशेष सखोल पुनरीक्षण अभियानांतर्गत मतदार यादीतील संभाव्य अनियमितता, दुबार नोंदी तसेच पात्र मतदारांची नावे वगळल्याच्या तक्रारींची सखोल चौकशी करण्याची मागणी काँग्रेसने केली आहे.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीबाबत उपस्थित झालेल्या प्रश्नांची सक्षम प्राधिकरणामार्फत निष्पक्ष चौकशी करून निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता व उत्तरदायित्व निश्चित करावे, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली.

दत्तात्रय पाईकराव यांचे निधन

नांदेड (प्रतिनिधी)– असर्जन येथील ज्येष्ठ नागरीक तथा जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त कर्मचारी दत्तात्रय रामजी पाईकराव यांचे गुरुवार, दि. २९ ऑक्टोबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.

त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली, सून आणि एक नात असा परिवार आहे. दत्तात्रय पाईकराव यांच्या पार्थिवावर शुक्रवार, दि. ३० ऑक्टोबर रोजी सकाळी ०९:३० वाजता असर्जन येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

शेतकरी, शेतमजुरांच्या प्रश्नांवरून माहुरमध्ये काँग्रेसचे आंदोलन

माहूर (प्रतिनिधी)– तालुक्यातील शेतकऱ्यांना कोरड्या दुष्काळामुळे हेक्टरी १ लाख रुपयांची आर्थिक मदत देणे, घरकुल लाभार्थ्यांची थकीत रक्कम तातडीने अदा करणे, माहूर नगरपंचायतीमधील विविध विकासकामांच्या कथित भ्रष्टाचाराची उच्चस्तरीय चौकशी करणे यांसह विविध जनहिताच्या मागण्यांसाठी माहूर तालुका काँग्रेसच्या वतीने गुरुवारी जोरदार निदर्शने करण्यात आली.

काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. विठ्ठल पावडे आणि तालुकाध्यक्ष आनंद पाटील तुपदाळे यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी संतप्त घोषणाबाजी करत शहरातून मोटारसायकल रॅली काढली. या रॅलीनंतर तहसीलदारांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

माहूर तालुक्यात कोरड्या दुष्काळसदृश परिस्थितीमुळे शेतकरी प्रचंड आर्थिक संकटात सापडले आहेत. शेतीचा वाढता खर्च, पिकांचे झालेले नुकसान आणि उत्पन्नातील मोठी घट यामुळे शेतकरी कुटुंबांसमोर उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर, परिस्थितीचे तातडीने सर्वेक्षण व पंचनामे करून बाधित शेतकऱ्यांना हेक्टरी १ लाख रुपयांची मदत तसेच पीक नुकसान भरपाई व दुष्काळी अनुदानाचे नियम नियमानुसार त्वरित वाटप करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली.

माहूर नगरपंचायत क्षेत्रातील सौरऊर्जा प्रकल्प, रस्ते व नाल्यांच्या कामांचा दर्जा आणि त्यात झालेल्या

कथित आर्थिक व्यवहारांवर नागरिकांकडून गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. या कामांमधील कथित अनियमिततेची स्वतंत्र आणि उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करावी, तसेच घरकुल योजनेतील लाभार्थ्यांची प्रलंबित थकीत रक्कम त्वरित अदा करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

लोकशाही आणि निवडणूक प्रक्रियेवरील जनतेचा विश्वास कायम राहण्यासाठी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या संदर्भातील आक्षेप व मागण्यांवर घटनात्मक तरतुदींनुसार निष्पक्षपणे विचार व्हावा. यासंदर्भात आंदोलकांची 'ज्ञानेश हटाव, देश बचाव' ही मागणी शासनापर्यंत पोहोचवावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

खा. अशोकराव चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त स्वच्छता कर्मचाऱ्यांना साड्यांचे वाटप

अर्धापूर (प्रतिनिधी) –माजी मुख्यमंत्री खासदार अशोकराव चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त नगरपंचायतीच्या स्वच्छता महिला कर्मचाऱ्यांना भाजप युवा मोर्चाच्या वतीने साड्यांचे वाटप करण्यात आले.

अर्धापूर नगरपंचायतच्या शहर स्वच्छता महिला कर्मचाऱ्यांना साड्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी नगराध्यक्ष प्रतिनिधी प्रवीण देशमुख, उपनगराध्यक्ष मुक्तेदरखान पठाण, सचिव पंडितराव लंगडे, नगरसेवक प्रतिनिधी डॉ. विशाल लंगडे, ॲड. ओमप्रकाश भुस्से, व्यंकटी राऊत, बाळू पाटील धुमाळ, विनायक लंगडे, अभिषेक गुरखेल, भाजयुमोचे शहराध्यक्ष तुकाराम माटे, आकाश साखरे, शंकर डोलारकर, अझर काजी, नामदेव सरोदे, नवनाथ ढगे आदी उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आकाश साखरे, वैभव शेंडगे, शंकर डोलारकर, शुभम भिसे, विक्की गायकवाड आदींनी परिश्रम घेतले.

खासदार अशोकराव चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त साड्यांचे वाटप करून भाजपच्या कार्यकर्त्यांनी सामाजिक बांधीलकी जोपासली.

दुष्काळग्रस्त ३०४ तालुक्यांतील पशुधनाची 'भारत पशुधन' प्रणालीवर नोंदणी करा

चारा, पाणी, पशुवैद्यकीय उपचार व शासकीय मदत योग्य पशुपालकांपर्यंत पोहोचविण्यासाठी पशुसंवर्धन विभागाचे आवाहन

नांदेड (प्रतिनिधी)–राज्यातील ३०४ तालुक्यांमध्ये घोषित करण्यात आलेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पशुधनाचे संगोपन व संवर्धन करण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने काटेकोर नियोजन केले आहे. दुष्काळाच्या काळात पशुधनासाठी चारा, बियाणे, चारा ठोंबे, वैद्यकीय उपचार तसेच इतर आवश्यक सेवा प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यासाठी सर्व पशुपालकांनी आपल्या पशुधनाची 'भारत पशुधन' प्रणालीवर नोंदणी अद्ययावत करावी, तसेच नवीन पशुधनाचे टॅगिंग करून त्याची नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात आले आहे.

दुष्काळी परिस्थितीत शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध उपाययोजना, मदतकार्य व सवलतींचा लाभ पारदर्शकपणे आणि थेट पात्र पशुपालकांपर्यंत पोहोचविण्यासाठी पशुधनाची भारत पशुधन प्रणालीवर नोंदणी असणे आवश्यक आहे. यासाठी पशुपालकांनी आपल्या परिसरातील नजीकच्या पशुवैद्यकीय केंद्राशी संपर्क साधून पशुधनाची अचूक नोंदणी करून घ्यावी. तसेच नवीन पशुधनाच्या कानात १२ अंकी ओळख क्रमांकाचा बिल्ला (टॅग) बसवून त्याची नोंद प्रणालीवर करण्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याचे आवाहन केले.

दुष्काळी परिस्थितीत पशुधनाचे संगोपन व संवर्धन ही पशुसंवर्धन विभागाची सर्वोच्च प्राथमिकता आहे. पशुपालकांनी आपल्या पशुधनाची अचूक नोंदणी व टॅगिंग 'भारत पशुधन' प्रणालीवर करून घ्यावे. या डिजिटल नोंदणीमुळे आपत्कालीन परिस्थितीत चारा बियाणे, चारा ठोंबे व इतर आवश्यक मदत पात्र पशुपालकांपर्यंत अचूकपणे पोहोचविणे शक्य होईल. त्यामुळे सर्व पशुपालकांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवून नजीकच्या पशुवैद्यकीय केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

Godateer Samachar हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड–(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४

ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com